RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१ सोमवार
जून २०२६
✽ वर्ष ६ ✽ अंक ३९
✽ पृष्ठ : ६ ✽ मूल्य रु : ३

## म्यानमारमध्ये भीषण स्फोट, 45 हून अधिक जणांचा मृत्यू




म्यानमारमध्ये भीषण स्फोटाची घटना रविवारी दुपारी घडली. या स्फोटात 45हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून 70 ते 74 जण जखमी झाले आहेत. ईशान्य म्यानमारच्या शान राज्यातील नामखाम टाउनशिपमधील काउंगटुप गावात हा स्फोट झाला. आतापर्यंत 46 मृतदेह सापडले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. या स्फोटामुळे 100 हून अधिक घरांचे नुकसान झाले आहे. इंडिया टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, खाणकामासाठी वापरण्यात येणारी स्फोटके ता'आंग नॅशनल लिबरेशन आर्मीच्या (TNLA) मालकीच्या एका इमारतीत ठेवण्यात आली होती.

# महायुतीचं मिटलं; जागावाटपाचं कोडं सुटलं

## विधान परिषद : भाजप 11, शिवसेना 4, राष्ट्रवादी 2 जागा

**विदर्भ केसरी। मुंबई :**



विधान परिषदेच्या 17 जागांसह राज्यसभेच्या एका जागेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवार अखेरचा दिवस आहे. जागावाटपावरून महायुतीत निर्माण झालेला तिढा रविवारी सुटला. महायुतीत भाजपच्या वाट्याला 11, शिवसेना शिंदे गटाला 4 आणि अजित पवार गटाला 2 जागा मिळाल्या. दुसरीकडे महाविकास आघाडीने दोन दिवसांपूर्वीच आपले जागावाटप जाहीर केले होते. त्यानुसार काँग्रेस 8, शिवसेना ठाकरे गट 4 व शरद पवार गट 3 जागा लढविणार आहे; तर नाशिक आणि नांदेड या दोन जागांवरील तिढा कायम आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून द्यायच्या 17 जागांच्या निमित्ताने गेले 15 दिवस राज्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. अधिकाधिक जागा लढविण्याचा भाजपचा आग्रह होता. मित्रपक्ष शिंदे गट 7 जागांसाठी आग्रहीहोता. त्यासाठी राज्यातील वाटाघाटीनंतर शिंदे यांनी थेट भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासोबत चर्चा केली. मात्र, या वाटाघाटीनंतर शिंदे गटाला चार जागांवर समाधान मानावे लागले. ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ या मतदारसंघांचा समावेश आहे. शिंदे यांचा बालेकिल्ला ठाण्यासाठी कोकणच्या जागेवरील दावा सोडावा लागला.

### उद्या शक्तिप्रदर्शन करत अर्ज भरणार

- **पक्षाने उमेदवारी जाहीर केल्यानंतर आता हे सर्व ११ उमेदवार उद्या आपापल्या संबंधित मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता असून, या अर्जांनंतर विधान परिषदेच्या रणधुमाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे.**
- **विधान परिषदेच्या निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी जारी करण्यात आजी. अर्ज भरण्याची शेवटची तारीख १ जून आहे. तर अर्जांची छाननी २ जून रोजी होणार आहे. उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी शेवटची तारीख ४ जून आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर मतमोजणी २२ जून रोजी होणार आहे.**

### असे ठरले जागावाटप

- **भाजप : नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली.**
- **शिवसेना (शिंदे गट) : ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ.**
- **राष्ट्रवादी (अजित पवार गट) : पुणे, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग.**

### सोलापूर, सांगली-सातारा भाजपकडे

- **महायुतीमध्ये भाजपच्या वाट्याला 11 जागा आल्या आहेत. राज्यातील बहुतांशी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये भाजपचे प्राबल्य आहे. त्यामुळे या निवडणुकांच्या माध्यमातून विधान परिषदेतील आपले संख्याबळ अधिक करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. भाजपच्या वाट्याला आलेल्या 11 जागांमध्ये नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा-सांगली या मतदारसंघांचा समावेश आहे.**

## 15 वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू

**विदर्भ केसरी।**

बार्शीतील शिवशक्ती मैदानावर बार्शी तालुका क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पमध्ये एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली आहे. शनिवारी सकाळी 7 ते 7.30 च्या सुमारास क्रिकेटची खेळपट्टी (पिच) तयार करण्यासाठी वापरला जाणारा जड रोलर अंगावर गेल्याने आरव ऊर्फ वीरेन योगीराज चौधरी (वय 15) या नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृत आरवचे वडील योगीराज चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी रीतसर फी भरून आरवला या क्रिकेट कॅम्पमध्ये प्रवेश मिळवून दिला होता. मात्र मैदानावर घडलेल्या या भीषण अपघातात त्यांना आपला मुलगा गमवावा लागला आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे सराव सुरू असताना कोच विवेक दुगम आणि अक्षय देबडवार यांच्या सांगण्यावरून 7 ते 7.30 च्या सुमारास 12 ते 15 वर्षांची मुले खेळपट्टीवरील जड रोलर ओढत होती. यावेळी जवळ कोणताही प्रशिक्षक, तंत्रज्ञ किंवा मोठी व्यक्ती उपस्थित नव्हती आणि कोचही लांब उभे होते. हा जड रोलर ओढत असताना अचानक आरवचा तोल गेला आणि तो खाली पडला. दुर्दैवाने हा रोलर त्याच्या पायापासून छातीपर्यंत अंगावरून गेल्याने त्याला मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. त्याला तातडीने जगदाळे मामा रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी बार्शी पोलिस पुढील तपास करत आहेत.

## नागपुरात कोट्यवधींचे एमडी ड्रग्ज पकडले

**विदर्भ केसरी। नागपूर:**


ड्रग्ज तस्करावर सिनेस्टाईल नजर ठेवत पोलिसांनी उप्पलवाडीतील एका फ्लॅटमधून तब्बल साडेसात किलो एमडी पावडर जप्त केली. या पावडरची किंमत चार कोटींहून अधिक आहे. या वर्षातील ही सर्वात मोठी कारवाई ठरली आहे. जरीपटका पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली. मजहर अली अकबर अली (२८, टेकानाका) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांना शहरात मोठ्या प्रमाणावर एमडीची खेप येणार असल्याची माहिती खबऱ्यांकडून मिळाली होती.



# बंगळुरू सलग दुसऱ्यांदा IPL चॅम्पियन बनले

### गुजरातला 5 गडी राखून हरवले; कोहलीने षटकार मारून विजय निश्चित केला,

**विदर्भ केसरी।**




IPL 2026 च्या अंतिम सामन्यात विराट कोहलीने पुन्हा एकदा आपली छाप सोडत रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूला (RCB) ऐतिहासिक विजय मिळवून दिला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या लढतीत RCB ने गुजरात टायटन्सचा पराभव करत सलग दुसऱ्यांदा IPL ट्रॉफीवर नाव कोरले.


सामन्यात गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करत 20 षटकांत 8 बाद 155 धावा केल्या. संघासाठी वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक झुंज देत 37 चेंडूत 50 धावांची खेळी केली. मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. शुभमन गिल 10, साई सुदर्शन 12 आणि जोस बटलरही कमी धावा करुन बाद झाल्याने गुजरातला मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

RCB च्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. जोश हेजलवूड आणि भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर रसिख सलाम डारने तीन विकेट्स घेत गुजरातच्या फलंदाजीला खिंडार पाडले. कृणाल पंड्यानेही एक महत्त्वाचा बळी घेतला. 156 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना RCB ला विराट कोहलीने दमदार सुरुवात करून अर्धशतक ठोकले. विशेष म्हणजे, IPL कारकिर्दीतील हे त्याचे सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. आपल्या 19 व्या IPL हंगामात, तेही अंतिम सामन्यासारख्या दबावाच्या क्षणी, विराटने युवा टी-20 फलंदाजांनाही लाजवेल अशी फलंदाजी केली. कोहलीने अवघ्या 11.2 षटकांत संघाला 113 धावांपर्यंत पोहोचवण्यात मोठी भूमिका बजावली. या हंगामात त्याने 648 धावा करत 167.01 च्या स्ट्राइक रेटने खेळ केला आहे. IPL 2026 मध्ये 600 हून अधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये वैभव सूर्यवंशी आणि ईशान किशन यांच्यानंतर सर्वाधिक वेगाने धावा करणारा फलंदाज म्हणूनही त्याने आपली छाप सोडली.

# राज्यात मान्सूनपूर्व पावसाची दमदार हजेरी

### चंद्रपूर, नाशिकसह जळगाव-बीडमध्ये वादळी वाऱ्यासह सरी; उकाड्यापासून नागरिकांना दिलासा

**विदर्भ केसरी।**



गेल्या अनेक दिवसांपासून प्रखर उष्णता आणि उकाड्याने हैराण झालेल्या महाराष्ट्रातील जनतेला अखेर मान्सूनपूर्व पावसाने मोठा दिलासा दिला आहे. रविवारी सायंकाळी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वारा, विजांचा कडकडाट आणि गारांच्या पावसाने हजेरी लावली. चंद्रपूर, नाशिक, जळगाव आणि बीड जिल्ह्यांत झालेल्या या पावसामुळे तापमानात घट होऊन सर्वत्र गारवा निर्माण झाला आहे.

गेल्या अडीच महिन्यांपासून तीव्र उष्णतेच्या लाटेने होरपळणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्याला रविवारी पावसाने चिंब भिजवले. दिवसभराच्या कडक उन्हानंतर संध्याकाळी अचानक सोसाट्याचा वारा सुटला आणि हलक्या पावसाला सुरुवात झाली. सुमारे अर्धा तास झालेल्या या पावसामुळे वातावरणातील उष्णता कमी झाली असून, उन्हाच्या काहिलीपासून नागरिकांना सुटका मिळाली आहे.

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव, मनमाड आणि ग्रामीण भागात विजांच्या कडकडाटासह मान्सूनपूर्व पाऊस झाला. यामुळे मशागतीच्या कामांना आता वेग येणार आहे. जळगावमधील चाळीसगाव आणि भडगाव तालुक्यातही सायंकाळी काळे ढग दाटून आले आणि जोरदार पाऊस बरसला. अनेक दिवसांच्या उकाड्यानंतर झालेल्या या पावसाचे नागरिकांनी स्वागत केले असून, शेतजमिनीत ओलावा निर्माण झाल्याने बळीराजा सुखावला आहे.




# राज्यात 10 जूनपर्यंत मान्सूनची प्रतीक्षाच

### 1 जून पासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**विदर्भ केसरी।**



राज्यातील कडाक्याच्या उन्हापासून हैराण झालेल्या नागरिकांना पावसाची प्रतीक्षा लागून राहिली असली, तरी मान्सूनच्या आगमनाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. राज्यातील बहुतांश भागात किमान १० जूनपर्यंत मान्सून दाखल होण्याची शक्यता नसल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मात्र, १ जूनपासून सुरू होणाऱ्या आठवड्यात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रासह अनेक भागांत वादळी पावसाची शक्यता असल्याने हवामानात मोठे बदल होणार आहेत. सध्या राज्यातील हवामान बदलण्यास सुरुवात झाली असून येत्या आठवड्यात त्याचे परिणाम अधिक स्पष्टपणे जाणवतील. प्रामुख्याने खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. कोकण किनारपट्टीवरही पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याची शक्यता आहे.

या पावसाळसदृश वातावरणामुळे मे महिन्याच्या तुलनेत राज्याच्या कमाल तापमानात काही प्रमाणात घट होऊन नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळेल. असे असले तरी, पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये पारा अद्यापही ४० अंश सेल्सिअसच्या वरच राहण्याची शक्यता आहे.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये. विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी झाडांखाली, टीनशेडखाली किंवा मोकळ्या जागेत उभे राहणे टाळावे. विद्युत ट्रान्सफॉर्मर, विजेचे खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहू नये. शेतकऱ्यांनी आपल्या पाळीव जनावरांना सुरक्षित जागी बांधावे, जेणेकरून वीज पडण्यासारख्या दुर्घटनांपासून त्यांचा बचाव करता येईल. हवामानातील हे बदल तात्पुरत्या स्वरूपाचे असले तरी, १० जूनपर्यंत मान्सूनची अधिकृत प्रतीक्षा कायम राहणार असल्याने नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे.

### मान्सून अद्याप केरळातच

- **हवामान विभागाने स्पष्ट केले आहे की, आगामी काळात होणारा वादळी पाऊस हा मान्सूनचा पाऊस नाही. मान्सून अद्याप केरळमध्ये पोहोचलेला नसल्यामुळे महाराष्ट्रात त्याचे आगमन लांबणीवर पडले आहे. या पार्श्वभूमीवर, कृषी विभागाने शेतकऱ्यांना अत्यंत मोलाचा सल्ला दिला आहे. मान्सूनपूर्व पडणाऱ्या वादळी पावसावर अवलंबून राहून शेतकऱ्यांनी पेरणीची अजिबात घाई करू नये. पुरेशा पावसाअभावी पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती असल्याने, मान्सूनचे अधिकृत आगमन आणि जमिनीतील ओलावा पाहूनच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

## अग्रलेख

# जलमेट्रोचा नवा पर्याय

मुंबई महानगर प्रदेशातील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी जलमेट्रो हा महत्त्वाकांक्षी आणि दूरदृष्टीचा प्रकल्प आकार घेत आहे. पहिली इलेक्ट्रिक हायड्रोफोईल बोट मुंबईत दाखल झाल्याने महामुंबईतील 21 जलमार्गांच्या विकासाला गती मिळाली आहे मुंबईसह कोकणात जलमेट्रोमार्ग विकसित होत आहेत. यातील पहिली बोट मुंबईत दाखलही झाली. महामुंबईत एकूण 21 जलमार्ग विकसित होणार आहेत. यामध्ये पालघर, रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई या विभागांचा सामावेश आहे. कॅंडेला पी 12 इलेक्ट्रिक हायड्रोफोईल या प्रकरातील ही फेरीबोट असणार आहे. ही बोट जलविमान कंपनीच्या ताफ्यात दाखल झाली आहे. महामुंबईच्या वेगवान वाहतुकीच्या आराखड्यातील हा प्रकल्प आता प्रत्ययरूपात आला आहे. वाहतूक विस्ताराच्या दृष्टीने उचलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पहिली बोट जेएनपीएमध्ये दाखल झाली असून मत्स्यविकासमंत्री नितेश राणे यांनीच याबाबतची घोषणा केली. मुंबई महानगर प्रदेशात जलमेट्रोचे जाळे विकसित होत आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात ही सेवा सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे. कस्टम क्लियरन्सनंतर या नव्या बोटीची चाचणी होणार आहे. या जलमेट्रोतील प्रवास सुरक्षित आणि वेगवान असेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे. मुंबईच्या जलमेट्रोसाठी 11 कॅंडेला जातीच्या 12 बोटी मागविण्यात आल्या आहेत. ताशी 40 किलोमीटर वेगाने या बोटी पाण्यावरून धावतात. एकाचवेळी 30 प्रवासी क्षमता असलेल्या या बोटी वेगवान मुंबईच्या वेगवान प्रवासासाठी महत्त्वाच्या ठरणार आहेत. सध्या महामुंबईमधील वाहतुकीची समस्या गंभीर रूप धारण करत आहे. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी पाहायला मिळते. अर्धा तासाच्या प्रवासाला दीड ते दोन तास लागतात, हा सार्वत्रिक अनुभव आहे. मुंबई शहरातून जाणारे मुंबई-अहमदाबाद, मुंबई-नाशिक, मुंबई-गोवा हे महामार्ग वाहतूक कोंडीचे ठरत आहेत. महामुंबईची कक्षा आता रायगड जिल्ह्यातील रोहा, कर्जत, खोपोलीपर्यंत, तर ठाणे जिल्ह्यात कसारा, मुरबाड, भिवंडीपर्यंत विस्तारलेली आहे. वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहने व याचा रस्ते वाहतुकीवर पडणारा मोठा ताण यामुळे कोंडीचे चित्र दिवसेंदिवस अधिक गडद होत आहे. खरे तर महामुंबईला सार्वजनिक वाहतूक सुविधेशिवाय पर्याय उरलेला नाही. यामुळेच अशा सुविधा नव्याने सुरू करणे ही या प्रदेशाची अनिवार्य अशी गरज होती. म्हणून या सेवेचे स्वागत करायला हवे. वाढती लोकसंख्या हा प्रश्न सर्वच महानगरांचा आहे. मुंबईचे बोलायचे झाले, तर महामुंबईची लोकसंख्या आता 2 कोटींपेक्षा वाढली आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला तेवढ्याच मोठ्या प्रमाणात वाहतूक व्यवस्था निर्माण करणे अनिवार्य आहे. सध्याचा विकास हा शहरी भागापुरताच मर्यादित आहे. आज औद्योगिकीकरणही शहरांपुरतेच मर्यादित आहे. म्हणूनच शहरे हाऊसफुल्ल, तर खेडी रिकामी पडलेली पाहायला मिळतात. या अवस्थेमध्ये शहरांसाठी वाहतुकीचे नवे पर्याय निर्माण होणे अनिवार्यच आहे. औद्योगिकीकरणाचा विस्तार शहरकेंद्रित आहे. यामुळेच महामुंबईचा विस्तार वेगाने होताना दिसतो. यावर उपाय म्हणून मेट्रो मार्ग 1 ते 16 याबरोबर जलमेट्रोमार्ग 11 विकसित केले जात आहेत. मुंबई, ठाणे शहरासाठी आणि एकूण कोकणसाठी जलमेट्रोमार्ग हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. महामुंबईच्या विस्तारात आता 74 गावांची नव्याने भर पडली आहे. या विस्तारासाठी हा 48 हजार कोटींचा मेगा प्लॅन तयार करण्यात आला आहे. तिसरी आणि चौथी मुंबई यातूनच तयार होणार आहे. पालघर जिल्ह्यात विकसित होणारे वाढवण बंदर आणि रायगड जिल्ह्यात विकसित झालेले आंतराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प शहर विस्ताराचे गेमचेंजर ठरत आहेत. यामुळेच शहर विस्ताराबरोबर दळणवळणाच्या नव्या सुविधांची गरज तेवढीच महत्त्वाची आहे.

# मिनी बँक संचालकाकडून महिलांची लाखो रुपयांची फसवणूक

## अखेर ८ दिवसांनंतर पोलिसांत गुन्हा दाखल : ठाणेदारांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



### तपास काढून घेण्याची मागणी

■ आरोपीला वाचवण्यासाठी पोलिसांनी जाणीवपूर्वक विलंब केला. त्यामुळे या प्रकरणाचा तपास विद्यमान ठाणेदारांकडून काढून घेण्यात यावा आणि पोलीस अधीक्षकांनी स्वतः यात लक्ष घालावे," अशी मागणी पीडित महिलांनी केली आहे. तसेच, या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आरोपींना परिसरातून तात्काळ तडीपार करावे, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.या प्रकरणाने अंजनगाव सुर्जी परिसरात खळबळ उडाली असून, आता पोलीस अधीक्षक यावर काय कडक पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**▸विदर्भ केसरी। अंजनगाव सुर्जी**

मुऱ्हा देवी येथील बचत गटातील महिलांची एका मिनी बँक संचालकाने लाखो रुपयांनी फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकरणात तक्रार देण्यासाठी महिलांना तब्बल आठ दिवस पोलीस स्टेशनच्या चकरा माराव्या लागल्या. रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनच्या ठाणेदारांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्याने आता पोलिसांच्या कार्यक्षमतेवर आणि भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मुऱ्हा देवी येथील महिला बचत गटांचे पैसे मिनी बँक (CSC) संचालकाने हडप केल्याची घटना १० दिवसांपूर्वी समोर आली होती. हक्काचे पैसे बुडाल्याने हवालदिल झालेल्या महिला तक्रार देण्यासाठी रहिमापूर चिंचोली पोलीस स्टेशनला गेल्या असता, ठाणेदारांनी त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास वारंवार नकार दिला. महिलांची दाद घेतली जात नसल्याचे पाहून शिवसेना शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार यांनी या प्रकरणात पुढाकार घेतला. त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे (SDPO) रीतसर निवेदन देऊन महिलांची तक्रार नोंदवून घेण्याची विनंती केली. तरीही स्थानिक स्तरावर टाळाटाळ सुरूच होती. अखेर, मिनी बँक (CSC) कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः हस्तक्षेप करून पोलिसांना गुन्हा दाखल करण्याची विनंती केली, त्यानंतर आरोपी मतिन सौदागर याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. मुऱ्हा देवी येथिल ९ महिला बचत गटाच्या तक्रारीवरून मिनी बँक संचालक मतिन सौदागरवर भारतीय न्याय संहिता बी एन एस २०२३ ३१८(४), ३३६(३),३४०(२) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले लाखो रुपयांची फसवणूक झालेली असतानाही पोलिसांनी महिलांना सहानुभूती न दाखवता आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न का केला? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. परिसरात सौदागर कुटुंबाची मोठी दहशत असल्याचे बोलले जाते. या कुटुंबातील सदस्यांवर यापूर्वीही हत्ये सारखे गंभीर गुन्हे दाखल असून, अवैध दारू विक्री. अवैध वाळू,आणि गोमांस तस्करीसारख्या व्यवसायात त्यांचा सहभाग असल्याची चर्चा आहे. याच 'अर्थपूर्ण' संबंधांमुळे पोलीस कारवाई करण्यास कचरत होते का, असा संशय महिला बचत गटांनी व्यक्त केला आहे.

# निराधार व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी भारतीय जैन संघटनेचा स्तुत्य पुढाकार

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी भारतीय जैन संघटना (BJS) महाराष्ट्र राज्याच्या वतीने एक महत्त्वपूर्ण व संवेदनशील उपक्रम राबविण्यात येत आहे. संस्थापक अध्यक्ष शांतीलाल (भाऊ) मुथ्था यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी संघटनेने स्वीकारली आहे. या योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील इयत्ता ५ वी ते ७ वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या मुला-मुलींना वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प, पुणे येथे प्रवेश देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना निवास, भोजन, कपडे, शैक्षणिक साहित्य तसेच इतर आवश्यक सुविधा पूर्णपणे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार असून बारावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षणही मोफत दिले जाणार आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी भारतीय जैन संघटनेचे विदर्भ अध्यक्ष संदीप मुनोत, विदर्भ सचिव डॉ. शेखर बंड, कार्यकारिणी सदस्य महेंद्र बोरा, दिलीप रेदासनी, कीर्ती मुथा, वंदना बोरंदिया, जिल्हाध्यक्ष सुशील कटारिया, विनय मुनोत (राळेगाव), रुपेश भंडारी (उमरखेड), डॉ. सारिका शहा, विजय चुंबळे व श्रद्धा सोईतकर यांच्यासह अनेक पदाधिकारी सक्रियपणे कार्यरत आहेत. संस्थापक अध्यक्ष शांतीलाल (भाऊ) मुथ्था यांच्या सूचनेनुसार श्री. विकास बहुले व श्री. विकास लोणकर यांनी यवतमाळ येथे भेट देऊन प्रवेश प्रक्रियेला गती दिली. जिल्हा समन्वयक डॉ. शेखर बंड, मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक मनीष बनसोड, तसेच BJS चे विजय चुंबळे व श्रद्धा सोईतकर यांनी विद्यार्थी व पालकांना या योजनेबाबत मार्गदर्शन करून प्रवेश अर्ज भरून घेण्याचे काम सुरू केले आहे.

दरम्यान, ज्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश निश्चित केलेला नाही, त्यांनी २ जूनपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन भारतीय जैन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. या उपक्रमामुळे आर्थिक व सामाजिक अडचणींना सामोरे जाणाऱ्या शेतकरी कुटुंबातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम आशेचा किरण ठरत आहे.

# द महाराष्ट्र फाईल्स' चित्रपटाचे प्रदर्शन लांबणीवर

### जय सेवालाल गोर भिया बंजारा याडीर बारेमाई छ इ सिनिमा

**▸विदर्भ केसरी। किनवट ता.प्र.।डॉ.भारत राठोड**







बहुचर्चित मराठी चित्रपट 'द महाराष्ट्र फाईल्स' हा त्याच्या टीझर, ट्रेलर आणि प्रसिद्ध झालेल्या गाण्यांमुळे कत छी तु बंजारा गोरमाटी गाणं सोशल मीडियावर तसेच प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चेत आला होता. चित्रपटाची प्रदर्शित होण्याची तारीख २९ मे जवळ आली असतानाच काही तांत्रिक कारणांमुळे त्याचे प्रदर्शन लांबणीवर टाकण्यात आले आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक संजीवकुमार राठोड यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीनुसार, चित्रपट जून महिन्यात रिलीज होणार आहे. आवश्यक तो बदल करून निर्मात्यांनी प्रेक्षकांच्या भावनांचा आदर राखून चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे. दिग्दर्शक संजीवकुमार राठोड पुढे असे ही म्हणाले कि येणाऱ्या प्रत्येक अडचणींवर मात करून ' द महाराष्ट्र फाईल्स ' हा चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी चित्रपटाची पूर्ण टीम रिलीज करण्यासाठी मेहनत घेत आहे. द काश्मीर फाईल, द केरला फाईल यांसारखे सत्य घटनेवर आधारित चित्रपट प्रेक्षकांच्या आणि चित्रपट समीक्षकांच्या पसंतीस उतरले असतांनाच या 'द महाराष्ट्र फाइल्स' चित्रपटाबद्दलही प्रेक्षक व चित्रपट समीक्षकांमध्ये कमालीची उत्सुकता बघायला मिळत आहे.

या चित्रपटात दिग्गज कलाकारांची फळी असून त्यामध्ये उषा नाडकर्णी, मंगेश देसाई, सयाजी शिंदे, नागेश भोसले, सनी लिओन आणि गौतमी पाटील व इतर कलाकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून त्याबद्दलची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. चित्रपटाची नवीन प्रदर्शित तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे संजीवकुमार राठोड यांनी सांगितले आहे. त्यामुळे सामाजिक विषयांची मांडणी केलेल्या या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या प्रेक्षकांना आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. मात्र, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर तो प्रेक्षकांच्या अपेक्षा पूर्ण करेल, असा विश्वास चित्रपटसृष्टीतील जानकार व समीक्षकांनी व्यक्त केले आहेत.

### ■ शब्दकोडे क्रमांक ३०७०

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | | ४ |
| | ■ | | ■ | ५ | | ■ | |
| ६ | ७ | | | | ■ | ८ | |
| ■ | ९ | | ■ | १० | | | |
| ११ | | | | | ■ | | ■ |
| १२ | | | ■ | १३ | १४ | ■ | १५ |
| | ■ | ■ | १६ | ■ | १७ | १८ | |
| १९ | | | | | ■ | २० | |

**आडवे शब्द** : १) शिजलेल्या अन्नाची भिक्षा; भिक्षा मागणारा ब्राह्मण, ३) सहनशील, ५) गडबड, गोंधळ, ६) सर्वसामान्यांचे दररोजचे जेवण; पतीपेक्षा वयाने मोठी असलेली पत्नी असणारे जोडपे, ८) चक्र, ९) एक केशवर्धक वनस्पती, १०) हळुवार व नाजूक आवाजातील गोडवा, ११) मारुतीपुत्राचे नाव, १२) मरणयातना भोगण्याची जागा, १३) फायदा, लाभ, हित, १७) एक लवचिक पदार्थ, १९) अतिशुद्ध व उत्तम (सोने), २०) पदार्थाचा सूक्ष्म अंश. **उभे शब्द** : १) विष्णूचे एक नाव, कृष्ण, २) हितकारक, ३) नेसलेल्या वस्त्राचा सुटा भाग, ४) कल्पक योजना, ५) मिसरी, मिश्री, ७) रमापती, विष्णू, ८) चाळण्याचे साधन, ११) मनोगत, बेत, विचार, युक्ती, १४) खूप, पुष्कळ, १५) सबब, निमित्त, १६) चार रस्ते जोडणारी जागा, १८) बगळा.

**शब्दकोडे क्रमांक ३०६९ चे उत्तर : आडवे शब्द** : १) पहाट, ३) शासन, ६) कसा, ८) बदल, १०) मानमरातब, १२) हेका, १३) धीर, १५) मवाली, १७) सर्जन, १८) लाख, १९) सही, २०) मानव, २२) खानदानी, २३) तीव्रता.
**उभे शब्द** : १) परमावधी, २) टकमक, ४) सबब, ५) नद, ७) सारा, ९) ललकारी, ११) तळवा, १४) रसहीन, १५) मनमानी, १६) लीलावती, १९) सखा, २१) भाता.

**सुडोकू क्र. ४४१९**

| | | | |
|---|---|---|---|
| २ | | | |
| | | २ | |
| | २ | | |
| | | | २ |

### कसे सोडवाल सुडोकू?

सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

**उत्तर क्र. ४४१८**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | १ | २ | ४ |
| २ | ४ | ३ | १ |
| ४ | ३ | १ | २ |
| १ | २ | ४ | ३ |

## महत्त्वाचे....



# डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान ने दिला सामाजिक बांधिलकीचा परिचय !

### लोहारा येथे मोफत पाणी वाटप !

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर बाळापूर**

तालुक्यातील हाता येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान चे वतीने लोहारा येथे मोफत पाणी वाटप करण्यात येत असल्याने गावकऱ्यांच्या वतीने कौतुकास्पद प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत. अंदाजे दहा हजारावर लोकसंख्या असलेल्या लोहारा येथील ग्रामपंचायत कडून करण्यात येत असलेला गावातील पाणी पुरवठा मागील जवळपास तीन महिने पूर्वी पासून बंद असल्याची माहिती आहे. तर गावातील पाणी पुरवठा सुरू करने बाबतीत गावकऱ्यांच्या कडून संमधीताकडे प्रत्यक्ष भेट देऊन व्यथा मांडल्या व गावातील पाणी पुरवठा सुरू करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. त्याअनुषंगाने संमधीत विभागाकडून गावात प्रत्यक्ष भेट देऊन लवकरच पाणी पुरवठा सुरू करण्याचे आश्वासन दिले.परंतु बराच कालावधी उलटून सुध्दा पाणी पुरवठा सुरू करणे संदर्भात कुठल्याच हालचाली झाल्या नाहीत. परिणामी गावकऱ्यांवर हांडाभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मिळेल तेथून रखरखत्या उन्हात लहान मुलांसह पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे विदारक चित्र निर्माण झाले होते. गावकऱ्यांवर ओढवलेल्या बिकट परिस्थितीची जाणीव ठेवून हाता येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान चे वतीने स्वखर्चाने लोहारा गावात ठिकठिकाणी पाण्याचे टॅंकर उभे करून गावकऱ्यांना मोफत पाणी वाटप करण्यात येत आहे. त्यामुळे अंदूरा ऍग्रो प्रोडूसर कंपनीचे अध्यक्ष प्रशांत वराडे यांच्या सहकार्यातून तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान चे पदाधिकारी व सदस्य यांच्या प्रती गावातील तसेच परिसरातील नागरिकांच्या कडून कौतुकास्पद प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत.

### संमधीत विभागाची उदासीनता !

■ **गावात भिषण पाणी टंचाई नागरिकांना भेडसावत असल्याचे चित्र निर्माण झाले असताना संमधीत विभागाकडे वारंवार परिस्थिती निदर्शनास आणून दिली असतानाही संमधीत विभागाकडून केवळ आश्वासनाची बोळवण करण्यात येवून उदासीनतेचा परिचय दिला असल्याचा गावकऱ्यांच्या कडून आरोप करण्यात येत आहे.**

# चोंढी येथे तपासणी



**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत वेगवेगळी नाविन्य उपक्रम राबविणारी ग्रामपंचायत म्हणून ग्रामपंचायत पुसद तालुक्यातील चोंढी कडे पाहल्या जाते मागील सप्टेंबर 2025 पासून ते मार्च 2026 पर्यंत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा कालावधी असून पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल कुमार आंदेलवाड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व विस्तार अधिकारी संतोष डाखोरे विलास पिंपळे शेख यांच्या सहकार्याने व व गावकऱ्यांच्या अथक परिश्रमाने ग्रामपंचायतीने या कालावधीमध्ये आतापर्यंत वेगवेगळे उपक्रम व विकास कामे केलेली आहे त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय चमूने बुधवार रोजी जिल्हा परिषद गडचिरोली येथील मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने पाहणी व तपासणी केली सदर समितीमध्ये सुहास गाडे सर (भा.प्र.से.) समिती प्रमुख तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली. राहुल काळभोर समिती सदस्य तथा प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.) जिल्हापरिषदगडचिरोली.पंकजभोयर समिती सदस्य तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) जिल्हा परिषद गडचिरोली. चेतन हिंवज समिती सदस्य तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (न.) जिल्हा परिषद गडचिरोली. विनोद उद्धरवार समिती सदस्य तथा कार्यकारीअभियंता(ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद गडचिरोली. दीपक बानाईत समिती सदस्य तथा उपमुख कार्यकारी अधिकारी (म.व बा.क.)जिल्हा परिषद गडचिरोली.आकाश चाफले समिती सदस्य तथा जिल्हा व्यवस्थापक (रा. ग्रा.स्व.अ.) जिल्हा परिषद गडचिरोली.

तसेच सोबत जिल्हा परिषद यवतमाळ येथील विस्तार अधिकारी अनिल जगताप व ग्रामपंचायत अधिकारी सतीश काळे या चमुने ग्रामपंचायत ने केलेल्या विकास कामाची पाहणी केली दिव्यांग व्यक्ती श्री गुलाब श्रीचंद्र चव्हाण यांच्या घरकुलांना भेट देण्यात आली. यावेळी पंचायत समिती पुसद येथील सह.गट विकास अधिकारी श्री संजय राठोड साहेब, जि प पाणीपुरवठा उप अभियंता संजय गेडाम, महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी बापूसाहेब चिंचांने, जि प सिंचन विभागाच्या सीमा तायडे मॅडम, विस्तार अधिकारी संतोष डाखोरे, विलास पिंपळे, शेख साहेब ,बचत गट विभागाची कांबळे , राठोड साहेब, जि प पाणीपुरवठाची कनिष्ठ अभियंता श्री राऊत साहेब, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे पदाधिकारी तुकाराम राठोड, संतोष तडसे,मंगेश देशमुख अश्विन तांबडे,ओंकार ठाकूर माळवे,गावातील मोठ्या प्रमाणात महिलांचा सहभाग दिसून आला तसेच सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सचिव पोलीस पाटील गावातील जेष्ठ मंडळी तरुण मंडळी शिक्षक अंगणवाडी सेविका अशा सेविका बचत गटातील महिला ग्रामपंचायत स्तरावरील सर्व कर्मचारी पंचायत समिती स्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेचआरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी व सर्व कर्मचारी उपस्थित होते, ग्रामपंचायत सर्व विकास कामाची व दस्ताऐवजाची माहिती घेऊन तपासणी कजरण्यात आली सोबतच गांडूळ खत निर्मिती प्रकल्प वाचनालय सेल्फी पॉईंट मीयावाकी प्रकल्प खुली व्यायाम शाळा जिल्हा परिषद शाळा अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट देऊन झालेल्या विकास कामाचे पाहून समाधान व्यक्त करण्यात आले सदर कार्यक्रम व्यवस्थित होण्याकरिता ग्रामपंचायत कर्मचारी व पोलीस पाटील यांनी अथक परिश्रम घेतली


दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published



## सुरोशे हत्याप्रकरणी राळेगाव तालुक्यात निवेदन

राळेगाव : उमरखेड येथील बजरंग दलाचे कार्यकर्ते गजानन मारोती सुरोशे यांच्या निर्घृण हत्या प्रकरणातील आरोपींवर कठोर गुन्हे दाखल करून तत्काळ कडक कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी राळेगाव बजरंग दलाच्या वतीने तहसीलदार अमित भोईटे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनाद्वारे मुख्य आरोपी शेख सुल्तान शेख अल्लावली व त्याच्या साथीदारांवर भारतीय न्याय संहितेतील कलम ३०२ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करून संघटित गुन्हेगारी अंतर्गत मकोका लावण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

# दरवाढी विरोधात दे धक्का आंदोलन

## बहुजन मुक्ती पार्टी ची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




वाढती महागाई, बेरोजगारी, स्मार्ट मीटरच्या माध्यमातून होत असल्याचा आरोप असलेली आर्थिक लूट, वाढते वीज बिल तसेच पेट्रोल-डिझेल व गॅस दरवाढीच्या निषेधार्थ बहुजन मुक्ति पार्टीच्या वतीने आज (दि. 31 मे 2026) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे अनोख्या पद्धतीने "दे धक्का" आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी दुचाकी आणि चारचाकी वाहने प्रत्यक्ष ढकलून (धक्का देऊन) केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात निषेध नोंदविला. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे सामान्य नागरिकांचे वाहन चालविणे कठीण झाले असून, भविष्यात अशीच परिस्थिती राहिल्यास वाहने चालविण्याऐवजी धक्का देण्याची वेळ येईल, असा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी महागाई, बेरोजगारी, वाढती वीज बिले आणि स्मार्ट मीटर योजनेविरोधात घोषणाबाजी केली. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, युवक, महिला व सर्वसामान्य नागरिकांनी आंदोलनात सहभाग घेत सरकारने जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

आंदोलनात स्मार्ट मीटर योजना रद्द करणे, वाढीव व चुकीच्या वीज बिलांची चौकशी करणे, पेट्रोल-डिझेल व गॅसचे दर कमी करणे तसेच बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे या प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

यावेळी बहुजन मुक्ति पार्टीचे नेते बिमोद मुधाने यांनी शासनावर टीका करत, "महागाईमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. पेट्रोल-डिझेलच्या सततच्या दरवाढीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल," असा इशारा दिला.

आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला सादर करण्यात आले. दुचाकी व चारचाकी वाहने धक्का देऊन करण्यात आलेल्या या अनोख्या आंदोलनाची जिल्हाभरात चर्चा रंगली. यावेळी ज्योती शामकुवर, बहुजन मुक्ती पार्टी प्रदेश उपाध्यक्ष, अशोक भोयर यवतमाळ जिल्हा प्रभारी BMP, चंदा वानखडे, आरती मुधाने, प्रीती गवई, अर्चना लढे,अरुण गोसाई, मनोज आत्राम, सुरेंद्र परडके,मिलिंद बडसे, प्रकाश वावरे , करण खंडारे,चंदन बाराहाते, नरेंद्र खरतडे, संजय कानिंदे,दिलीप भवरे, लोभेश्वर झाडे, विकास इंगोले, प्रफुल बोदडे, सुकलाल देशपांडे, चंद्रशेखर पाढेन,देवराव साठे, रवींद्र काळे,अशोक खोब्रागडे, सुदाम पेंदोर, धनराज चंदल, यासह भारत मुक्ती मोर्चा, भारतीय बेरोजगार मोर्चा, राष्ट्रीय किसान मोर्चा, राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद, यासह विविध संघटनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी होते.

### महत्त्वाचे



## चातक पक्षी...

शिरसगाव कसबा प्रतिनिधी अक्षय गुर्जर::-चातक पक्षी हा हजारो किलोमीटर साधारण दक्षिण आफ्रिकेवरून आपल्या भागात आला आहे.दि.३१ मे ला खरपी येथील शेतात हा पक्षी बघितला.याचा अर्थ सरळ मान्सूनशी जोडला जातो, मान्सून वारे दाखल झाले आहेत. चातक पक्षी हा फक्त मान्सून काळात स्वाती नक्षत्रात पाणी पितो अशी अख्यायिका आहे.सध्या त्यांचा विनीचा हंगाम सुरु होणार आहे. हा पक्षी स्वतः घरट बांधत नाही, सातभाई या पक्ष्यांच्या घरट्यात अंडी घालतो. कारण हा कोकिळा यां पक्षाच्या कुळातील आहे.

- अभिषेक खेरडे, हवामान अभ्यासक आणि पक्षीमित्र.



## येवदा येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी; 'मन की बात' कार्यक्रमाचे आयोजन

**▸विदर्भ केसरी। येवदा :**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने येवदा येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचेही सामूहिक श्रवण करण्यात आले.कार्यक्रमात उपस्थितांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. तसेच 'मन की बात' कार्यक्रमातून पंतप्रधानांनी मांडलेल्या विविध सामाजिक व राष्ट्रीय विषयांवरील विचारांचे श्रवण केले. यावेळी ओमप्रकाश शर्मा, संजय वाघमारे, चंदूभाऊ रघुवंशी, नितीन बढे, नकुल सोनटक्के, मयूर वांदे, पिंटूभाऊ आसरे, अभिजीत कराळे, दिलीप दवंडे, अमोल कवळे आदी उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## सिद्धार्थ विद्यालयाचे पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे यांचा निरोप समारंभ संपन्न....

**▸विदर्भ केसरी। वार्ताहर मंगरूळपीर,**

स्थानिक-: सिद्धार्थ विद्यालयातील गणित शिक्षक व पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे यांचा निरोप समारंभ 30 जून 2026 शनिवार रोजी सिद्धार्थ विद्यालयामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सिद्धार्थ विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कु. किरण कांबळे तर संस्थेच्या अध्यक्षा सौं सुलभाताई कांबळे, संस्थेचे सचिव अशोकभाऊ कांबळे,संस्थेचे उपाध्यक्ष उत्तमराव मनवर. भाईजी महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक नितीन मनवर, माजी मुख्याध्यापक के टी मुंजे व माजी शारीरिक शिक्षक अनिल मनवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्वप्रथम संस्थेच्या अध्यक्षा, संस्थेचे सचिव, आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सह पत्नीक सिद्धार्थ कांबळे यांचा सत्कार केला. सिद्धार्थ कांबळे यांनी विद्यालयामध्ये 34 वर्ष पूर्ण गणित शिक्षक व पर्यवेक्षक म्हणून विद्यालयाला सेवा दिली.गणित विषयात ते पारंगत असून गणित विषयाची त्यांना फार गोडी होती. त्याचा फायदा प्रत्येक विद्यार्थ्याला व्हायचा गणित विषयात मध्ये 100% दरवर्षी निकाल लागायचा. या निरोप समारंभामध्ये शाळेचे ज्येष्ठ शिक्षक जगताप यांनी प्रास्ताविक केले तर अनेक शिक्षकांनी त्यांच्याविषयी भाषणामधून मनोगते व्यक्त करून त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा दिल्या. गणित शिक्षक पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे यांनी आपल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाला उत्तर देताना 'शाळेने मला भरपूर दिले'. मी विद्यार्थ्यांना भरपूर माझ्या विषयाचे ज्ञान देण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला. माझ्या विषयात शालांत परीक्षेत 100 पैकी 100 गुण मिळून दाखविले. अतिरिक्त तासिका घेऊन मी माझा कठीण विषय सोपा करून सांगितला असे मनोगत त्यातून व्यक्त केले. शेवटी निरोप समारंभ येताना ते भावुक झाले. तर मुख्याध्यापिका कार्यक्रमाच्या अध्यक्ष्या कु किरण कांबळे यांनी आपले अध्यक्षीय भाषणामधून त्यांच्या केलेल्या कार्याचा सकारात्मक गुणगौरव केला. त्यांची मुलगी कोमल सिद्धार्थ कांबळे उपस्थित होती.याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक जे जी उगले, भास्कर जीवने, राजू तेलंग, राम व्यवहारे,राजेश राऊत , गिरीश उजवणे, संतोष भेंडेकर, विजय चव्हाण, शैलेश सोळंके, विजय इंगोले, निलेश मिसाळ, रितेश पजई व शिक्षिका कु जयश्री भोयर, सौं अर्चना देशमुख, कु.मीनाक्षी राठोड तर शिक्षकेतर कर्मचारी सत्यवान गावंडे, अमीन चव्हाण, गजानन बुधे, शंकर माकोडे, अमित मेश्राम कार्यक्रमाला उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी शिक्षक राजू सोनोने आभार राम व्यवहारे यांनी केले.





## श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सौंदर्यीकरण कामाचे शिलाअनावरण उत्साहात

**▸विदर्भ केसरी। निलेश पाटील**

मंगरूळपीर, दि. 31 मे 2026 : श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात येत असलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक व परिसर सौंदर्यीकरण कामाच्या शिलाअनावरणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला वाशिम-मंगरूळपीर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्याम रामचरण खोडे प्रमुख उपस्थित होते. यावेळी नथूजी कापसे, सुनीलभाऊ मालपाणी, भाजपा उपनगराध्यक्ष अनिल गावंडे, पंकज पाटील ढोरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. सौंदर्यीकरण कामाचे कारागीर कोल्हापूर येथील लखन ढोबळे तसेच चंदू पाटील राऊत, रवीभाऊ चव्हाण, प्रशांत गावंडे आदींचीही यावेळी विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते शिलाअनावरण करून कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी बोलताना आमदार श्यामभाऊ खोडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. तसेच राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त तालुक्यातील व शहरातील सर्व नागरिकांना विनम्र अभिवादन केले.

# गरीब नगरमधील कारवाईचा बदला !

## मुंबईला हादरवणाऱ्या मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा कट उघड; तपासात धक्कादायक माहिती समोर



**▸विदर्भ केसरी। बदलापूर:**

वांगणीतल्या अनधिकृत चाळींवर अखेर महसूल विभागाने हातोडा टाकला आहे. वांगणी पश्चिमेकडील एकविरा नगर भागात अंबरनाथचे तहसीलदार अमित पुरी यांच्या उपस्थितीत धडक कारवाई करत महसूल विभागानं 100हून अधिक घरं जमीनदोस्त केली आहेत. या कारवाईमुळे चाळमाफियांचे धाबे दणाणले आहेत. महत्वाचं म्हणजे या चाळींमध्ये बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांचं वास्तव्य वाढत असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे या कारवाईनं गुन्हेगारांनाही चाप बसणार आहे.

वांगणी ग्रामपंचायत हद्दीत चाळ माफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला होता. वांगणी पश्मिमेकडे मोठ्या प्रमाणात अनधिकृत चाळींचं बांधकाम करण्यात आले होते. सोशल मीडियात स्वस्त घरांच्या फसव्या जाहिराती करत त्याची गोरगरीबांना विक्री केली जात होती. या चाळ माफियांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या जागेतही अवैध बांधकामे केली होती. याबाबत अनेकदा तक्रारी झाल्यानंतर वांगणीच्या सरपंच वनिता आढाव यांनी याबाबत सातत्याने पाठपुरावा केला होता.डिसेंबर 2025 मध्ये सरपंच वनिता आढाव यांच्या नेतृत्वा शिष्टमंडळाने तहसीलदार अमित पुरी यांची भेट घेत एक निवेदनही दिले होते. त्यानंतर तहसीलदारांनी स्वतः पाहणी करून या बांधकामांबाबत आढावा घेतला होता. या बांधकामधारकांना नोटीस बजावून खुलासा करण्यास सांगितले होते. मात्र ते दिलेल्या मुदतीत योग्य खुलासा करू शकले नाहीत. त्यानंतर अंबरनाथचे तहसीलदार अमित पुरी यांनी मोठ्या फौज फाट्यासह वांगणीत धडक कारवाई केली. या कारवाईत जवळपास 100 हून अधिक घरं जमीनदोस्त करण्यात आली आहेत. याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागानेही राज्य महामार्गावरील अतिक्रमणांवर कारवाई केली आहे.

**■ वांगणी परिसरात विविध ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू असल्याबाबत तक्रार येत होत्या. त्यात काही असामाजिक गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक राहायला येत असल्याच्या तक्रारीही पोलिस आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली आहे. वारंवार नोटीस देऊन जर अनधिकृत बांधकाम करण्याचे प्रकार थांबत नसतील तर संबंधितांवर एमआरटीपीनुसार गुन्हे दाखल करून कार्यवाही करण्यात येणार येणार आहे. - अमित पुरी, तहसीलदार अंबरनाथ**

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल, चार अल्पवयीन आरोपी ताब्यात

**▸विदर्भ केसरी। संघरतन सरदार /**

बाहेरगावी शिक्षण घेत असलेल्या १४ वर्षीय जुळ्या बहिणींचा पाठलाग करून एकाने हात धरून विनयभंग केल्याची गंभीर घटना रहीमापुर पोलीस स्टेशन हद्दीतील विहीगाव येथे घडली. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून रहीमापुर पोलिसांनी पोस्को कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करत चारही अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी गावी आलेल्या जुळ्या बहिणी जेवणानंतर दि.२९ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास विहीगाव फाट्याकडे फिरण्यासाठी गेल्या होत्या. डांबरी रस्त्याने परत येत असताना त्यांच्या पुढे दोन आणि मागे दोन असे चार मुले चालत होते. या मुलांनी अश्लील इशारे आणि हावभाव करत मुलींना त्रास देण्यास सुरुवात केली. घाबरलेल्या बहिणींनी मध्येच लागणाऱ्या काकांच्या घरी थांबून काही वेळ थांबण्याचा प्रयत्न केला. मात्र, उर्दू शाळेजवळ तीच चार मुले त्यांची वाट पाहत थांबलेली दिसली. एका आरोपीने 'वो आगे, उनके पीछे चलो'असे म्हणताच दुसऱ्या आरोपीने पुढे येऊन पीडित मुलीचा हात पकडला. मुलीने हात झटकून बहिणीसह जवळच्या मंदिरात धाव घेतली आणि तेथील महिलेला घटना सांगितली.मंदिरातून बाहेर पडताच रस्त्यावर पुन्हा एका आरोपीने मुलीला अडवून 'मुझे तू पसंद है, तेरा क्या कहना है' असे म्हणत त्रास दिला. दोन्ही बहिणी घरी पोहोचल्यावर वडिलांना संपूर्ण प्रकार सांगितला. ही माहिती समजताच परिसरातील नागरिकांचा जमाव जमला होता. रहीमापुर-चिंचोली पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करून दोन्ही बाजूच्या जमावाला शांत केले आणि चारही अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. आरोपी आणि पीडिता वेगवेगळ्या समाजाचे असल्याने गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र पोलिसांच्या त्वरित कारवाईमुळे परिस्थिती नियंत्रणात आली.पीडित मुलीच्या तक्रारीवरून रहीमापुर पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO) सह भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७४, ७५(१)(आय), ७५(२), ७८, ३(५) आणि कलम ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणेदार अनंत वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# सफाई कामगारांवर उपासमारीची वेळ

## वंचितचा नगर परिषदेला अल्टिमेटम : वाशिम नगर परिषदेवर वंचित आक्रमक: सफाई कर्मचाऱ्यांना 1 तारखेलाच पगार देण्याची मागणी

**▸विदर्भ केसरी। वाशिम-**




वाशिम शहर स्वच्छ ठेवणाऱ्या सफाई कामगार व कचरा संकलन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना दर महिन्याला नियमित वेतन मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश सदस्या सौ. किरणाताई गिऱ्हे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांना निवेदन दिले आहे, निवेदनात म्हटले आहे की, शहरातील कचरा संकलन व सफाईची कामे इमाने इतबारे करणाऱ्या या कामगारांच्या पगारावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. मात्र महिनोन्महिने पगार थकल्याने त्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे दर महिन्याच्या 1 तारखेला या सर्व कामगारांचे वेतन नियमितपणे अदा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. मागणी मान्य न झाल्यास नगर परिषद कार्यालयासमोर लोकशाही पद्धतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सौ. गिऱ्हे यांनी दिला आहे, वंचितच्या या आक्रमक पवित्र्यामुळे नगर परिषद प्रशासनाच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.यावेळी वंचित बहुजन आघाडी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक सपकाळ, स्वप्निल खांदळे,आकाश पंडित, अक्षय सपकाळ,आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# एकाला मिळते गती, दुसऱ्याच्यामागे साडेसाती

## किनवटमधील रेल्वे स्थानकाचा संथ कारभार : हिमायतनगरचे काम पूर्ण आणि किनवटचे कधी होणार..?

**▸विदर्भ केसरी। किनवट ता.प्र. डॉ.भारत राठोड**

अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत येथील रेल्वे स्थानकाच्या विकासकामांना गती मिळत नसल्याने प्रवाशांमधून संताप व्यक्त होत आहे. याच मार्गावरील हिमायतनगर रेल्वे स्थानकाचे काम पूर्ण झाले. परंतु, किनवटच्या कामाला लागलेली 'साडेसाती' कधी संपणार? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.
रेल्वे स्थानकाच्या आणि आधुनिकीकरणासाठी पुनर्विकासासाठी २ वर्षे ८ महिन्यांपूर्वी म्हणजेच ६ ऑगस्ट २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन प्रणालीद्वारे प्रकल्पाची पायाभरणी करण्यात आली. आदिलाबाद ते नांदेड या मार्गावरील या महत्त्वाच्या स्टेशनचा कायापालट होईल, अशी अपेक्षा होती. आणि गुत्तेदाराचे अधिकाऱ्याच्या मनमानीमुळे प्रत्यक्षात कामाची गती संथ परिसरात प्रवाशांना प्रचंड हाल सोसावे लागत आहेत. काही दिवसांपूर्वी रेल्वे प्लॅटफॉर्म खोदून ठेवण्यात आला असून त्यावर छतही नाही. त्यामुळे प्रवाशांना प्रखर उन्हात गाडीची वाट पाहत उभे राहावे लागत आहे. रेल्वेच्या वरिष्ठांनी लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांतून होत आहे.
हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश आष्टीकर यांनी रेल्वे मंत्र्यांना या विकासकामांच्या अनुषंगाने २२ एप्रिल रोजी निवेदन देऊन विविध मागण्यांकडे लक्ष वेधले आहे.
मात्र, केवळ पत्रव्यवहार करून प्रश्न सुटणार नाही, असा सूर किनवटच्या जनतेमधून उमटत आहे. खासदारांनी एकदा रेल्वे स्थानकाला भेट देऊन प्रवाशांच्या समस्या जाणून घ्याव्यात. तेव्हाच किनवटच्या प्रवाशांचे कसे हाल होत आहेत हे त्यांच्या लक्षात येईल, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.
स्थानकावर प्रवाशांसाठी आवश्यक असलेले डिजिटल डिस्प्ले अद्यापही बसविण्यात आले नाही. त्यामुळे आरक्षण तिकीट केलेल्या प्रवाशांना आपली एक्स्प्रेस गाडी आल्यावर कोणता कोच कुठे येणार, याचा अंदाज लावता येत नाही. परिणामी, वृद्ध आणि दिव्यांग प्रवाशांची गाडी पकडताना धावपळ करावी लागत आहे. सर्वाधिक उत्पन्न देणारे रेल्वे स्थानक असूनही किनवटवरच अन्याय का?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# पत्नीच्या खुनात पतीला सश्रम कारावास

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

चारित्र्यावर संशय घेऊन तलवारी सारख्या लोखंडी हत्याराने पत्नीचा खून करणाऱ्या पतीला न्यायालयाने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. दलुराम गुलाब राठोड (वय 59, रा. यावली, ता. यवतमाळ), असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. बीएनएसएस कायद्यांतर्गत अवघ्या नऊ महिन्यात निकाली निघालेली ही पहिली घटना आहे.वडगाव जंगल पोलिस ठाण्यांतर्गत यावली गावात तीन जून 2025 च्या पहाटे साडेचार वाजता आरोपी पती दलुराम राठोड याने पत्नी बेबी राठोड हिच्यावर तलवारी सारख्या लोखंडी हत्याराने झोपेतच हल्ला केला होता. या घटनेची माहिती पोलिस पाटील यांनी वडगाव पोलिसांना दिली होती. पोलिसांनी घटनास्थळावर तत्काळ धाव घेतली. जखमी अवस्थेत असलेल्या आरोपी पतीला पोलिसांनी अटक करून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. तर मुलाच्या तक्रारीवरून खुनाचा गुन्हा नोंद केला होता. दरम्यान, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाने यांनी घटनास्थळी भेट दिली होती. घटनास्थळाचा पंचनामा, जप्ती, मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन, साक्षीदारांचे बयाण, जप्त मुद्देमाल, तपासाच्या अनुषंगाने सर्व घटक जप्त केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत शस्त्र पडताळणी, जखमांचे रेखाचित्र, इन्जूरी प्रमाणपत्र ताब्यात घेतले. तसेच पूर्वी दाखल केलेल्या तक्रारीचे अभिलेख हस्तगत केले. तर संपूर्ण तपास बीएनएसएस कायद्यान्वये पंचनाम्यापासून ते ई-साक्ष न्यायिक प्रणालीमध्ये केला. रात्रीच्या वेळी घटना असतानाही पुरावे गोळा करून दोषारोपपत्र ऑगस्ट 2025 मध्ये न्यायालयात दाखल केले. तपासी अधिकारी विकास दांडे, कोर्ट पैरवी रवी चव्हाण यांनी सरकारी अभियोक्ता शुभांगी दरणे यांची भेट घेऊन साक्षीदार, पंचांना वेळोवेळी ब्रिफ केले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, १ जून २०२६ | ४



## गांजाची विक्री करणाऱ्यास अटक

**▸विदर्भ केसरी। उमरखेड**

अंमली पदार्थ गांजाची विक्री करणाऱ्या व्यक्तीस उमरखेड-नांदेड महामार्गावरील मार्लेगाव फाटा येथे गांजा विक्री करताना अटक करण्यात आली. स्थानिक डीबी पथकाने ही कारवाई शनिवार, 30 मे रोजी केली. स्थानिक जामा मशिद वार्डातील शेख इब्राहिम उर्फ इरफान शेख पाशू (वय 25) हा उमरखेड-नांदेड महामार्गावरील मार्लेगाव फाट्यावर अवैध गांजा विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरून स्थानिक डीबी पथकाने त्या ठिकाणी जाऊन त्यास रंगेहात पकडले. यावेळी शेख इब्राहिम हा एका पिशवीत गांजा अंमली पदार्थ त्यामध्ये काही गांजा हा प्लॅस्टिकच्या पुड्यामध्ये पॅक केलेला होता. ज्याचे पिशवीसह वजन 1.285 किलो असून त्यास ताब्यात घेऊन कलम 8 (क), 20 (ब), (ळळ) (ब) एनडीपीएस ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

**महत्त्वाचे**

## आंतरराष्ट्रीय मासिक पाळी दिनानिमित्त जनजागृती व मार्गदर्शनपर सत्र संपन्न

**▸विदर्भ केसरी। अमरावती -**



'सहारा ग्रामविकास बहुद्देशीय संस्था, अमरावती', 'इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) अमरावती - वूमेन्स डॉक्टर्स विंग', आणि 'द अमरावती ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॉकॉलॉजी सोसायटी' (AOGS) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मासिक पाळी दिनाचे औचित्य साधून ग्राम माऊली जहागीर येथे किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी "मासिक पाळी व्यवस्थापन व मार्गदर्शन" या विशेष सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील सुमारे १२० ते १३० महिला आणि मुलींची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमात उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांना आरोग्य, स्वच्छता आणि मासिक पाळीशी संबंधित विविध विषयांवर अत्यंत मोलाचे व सविस्तर मार्गदर्शन केले. "माझी पाळी - माझे आरोग्य (स्वच्छता, सन्मान आणि जागरूकता)" – डॉ. श्रुती खंडेलवाल (अध्यक्षा, IMA अमरावती वूमेन्स विंग): डॉ. श्रुती खंडेलवाल यांनी मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी आणि स्वच्छतेचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. 'स्वच्छता हाच आरोग्याचा पाया आहे' हा संदेश देत त्यांनी महिलांना आरोग्याविषयी जागरूक केले. "मासिक पाळी एक नैसर्गिक प्रक्रिया - समज आणि गैरसमज" – डॉ. सायली जहागीरदार (सचिव, अमरावती OBGY सोसायटी):

डॉ. सायली जहागीरदार यांनी समाजात मासिक पाळीबाबत असलेले विविध जुने गैरसमज दूर केले. ही एक पूर्णपणे नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया असून याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. "मासिक पाळी बाबत आई आणि मुलीतील संवाद आणि कुटुंबाच्या भूमिकेचे महत्त्व" – डॉ. सुयोगा पानट (सचिव, IMA वूमेन्स विंग अमरावती): डॉ. सुयोगा पानट यांनी मासिक पाळीच्या काळात कुटुंबाच्या, विशेषतः आईच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. घरात आई आणि मुलीमध्ये या विषयावर कोणत्याही संकोचाशिवाय मोकळा संवाद असणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

"खुले चर्चासत्र आणि प्रश्नोत्तरे" – डॉ. प्रज्ञा चौधरी (कोषाध्यक्ष, OBGY सोसायटी अमरावती): डॉ. प्रज्ञा चौधरी यांनी उपस्थित महिला व मुलींच्या मनातील शंकांचे निरसन केले. महिलांनी अतिशय मोकळेपणाने आपल्या शारीरिक समस्या आणि प्रश्न मांडले, ज्यावर डॉक्टरांनी योग्य वैद्यकीय सल्ला दिला. "ग्रामीण महिलांचे आरोग्य आणि सामाजिक बांधिलकी" – सुरेखा पेठे (अध्यक्ष, सहारा ग्रामविकास बहुद्देशीय संस्था अमरावती): कार्यक्रमाच्या महत्वाच्या टप्प्यातील भाषणात सुरेखा पेठे यांनी ग्रामीण भागातील महिलांना आपल्या आरोग्याकडे अजिबात दुर्लक्ष न करण्याचे आवाहन केले. तसेच, अशा संवेदनशील विषयांवर ग्रामीण भागात सातत्याने सामाजिक उपक्रम राबवण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. सोबतच सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या समन्वयक राजश्री धोटे, तेजल कोहळे आणि माधवी मेश्राम यांनी विशेष परिश्रम घेतले व मोलाचे सहकार्य केले. ग्रामीण भागातील महिलांमध्ये मासिक पाळीविषयी असलेली भीती आणि संकोच दूर करून त्यांच्यात आरोग्याविषयी नवी चेतना निर्माण करणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य ठरला, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# विधान परिषदेसाठी सरकारला एवढी घाई का?

## जनतेचा संतप्त सवाल : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या



**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

■ राज्यातील बहुतांश जिल्हा परिषदांवर गेल्या २-३ वर्षांपासून प्रशासक आहेत. मग तिथे निवडणुका का घेतल्या जात नाहीत? जेव्हा ग्रामीण भागाचा कणा असलेल्या जिल्हा परिषद सदस्यांनाच मतदानाचा अधिकार मिळणार नाही, तेव्हा निवडून येणारा विधान परिषद आमदार खऱ्या अर्थाने त्या भागाचे प्रतिनिधित्व कसा करू शकेल?

■ सरकारला जनतेच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा स्वतःच्या जागा निवडून आणण्यातच जास्त रस आहे का? थोडक्यात सांगायचे तर, घटलेल्या मतदार संख्येच्या जोरावर विधान परिषदेची निवडणूक उरकून घेण्याचा सरकारचा हा प्रयत्न लोकशाहीचा संकोच करणारा वाटत आहे. जनतेला आता प्रशासकांच्या जाचातून मुक्ती हवी आहे आणि त्यांचे हक्काचे स्थानिक लोकप्रतिनिधी हवे आहेत. त्यामुळे सरकारने आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊन लोकशाहीचा पाया मजबूत करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

■ स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीचा पाया मानल्या जातात. तिथे प्रशासक असल्याने जनतेची दैनंदिन कामे रखडली आहेत, गावोगावी विकासाला खीळ बसली आहे. मात्र, या निवडणुका घेण्याऐवजी सरकारचे संपूर्ण लक्ष विधान परिषदेवर केंद्रित झाले आहे. आपल्या मर्जीतील नेत्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी आणि पक्षांतर्गत नाराजी दूर करण्यासाठीच सरकार हा घाट घालत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.

महाराष्ट्रात सध्या राजकीय घडामोडींना वेग आला असून, विधान परिषदेच्या आगामी निवडणुकांवरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. एकीकडे राज्यातील , जिल्हा परिषदा, आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या आहेत. असे असताना केवळ विधान परिषदेच्या जागा भरण्यासाठी सरकार दाखवत असलेल्या अतिउत्साहावर आता सर्वसामान्य जनतेतून आणि राजकीय वर्तुळातून तीव्र आक्षेप घेतला जात आहे. "सर्वसामान्यांशी संबंधित निवडणुका घ्यायला सवड नाही, मग विधान परिषदेची सरकारला एवढी घाई का?" असा थेट सवाल आता जनता विचारत आहे.

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून निवडून येणाऱ्या आमदारांसाठी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदांचे सदस्य आणि पंचायत समितीचे सभापती मतदान करतात. परंतु, सद्यस्थितीत महाराष्ट्रातील बहुतांश जिल्हा परिषदा, पंचायत समित्या वर प्रशासक राजवट लागू आहे. लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपल्यामुळे कायदेशीररित्या मतदारांची संख्या कमालीची घटली आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे प्रतिनिधित्व नसताना होणाऱ्या या निवडणुका लोकशाहीच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणाऱ्या आहेत, असा सूर नागरिकांमधून उमटत आहे.

# ३४ कोटींचं पाणी जनतेच्या नळात आलं... की फक्त फाईलांमध्येच वाहिलं?

## ▸▸ रस्ते खोदले पाईपसाठी... की हात मोकळे करण्यासाठी ?

**▸विदर्भ केसरी। देऊळगावराजा**

देऊळगावराजा शहरासाठी तब्बल ३४ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाल्याची घोषणा झाली आणि नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र आता शहरात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत या योजनेसाठी आतापर्यंत नेमका किती निधी नगरपरिषद प्रशासनाकडे प्राप्त झाला? प्राप्त निधीपैकी किती रक्कम खर्च झाली? कोणत्या कामांचे बिल अदा झाले? योजना कोणाच्या कार्यकाळात मंजूर झाली? प्रशासकीय काळात अधिक गती मिळाली की नवनिर्वाचित सत्ताधाऱ्यांच्या काळात? काम पूर्ण होण्याची मूळ मुदत काय होती? कारण शहरात पाईपलाईन दिसत आहे,



खोदलेले रस्ते दिसत आहेत, पण नियमित पाणी मात्र दिसत नाही, अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

फिल्टर प्लांट बंद? नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीरखरा प्रश्न — योजना अडकली कुठे? शहरातील जाणकारांच्या मते योजना अपूर्ण का राहिली? कामामध्ये तांत्रिक त्रुटी आहेत का? निधी कमी पडला का? की कुणीतरी "हात धुऊन घेतल्यामुळे शहर अजूनही तहानलेले आहे? या प्रश्नांची पारदर्शक चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे. "हिशेबांच्या पाण्यात कुणाचे चेहरे धुतले गेले कळले नाही, पण तहानलेल्या शहराचे डोळे मात्र रोज भरून आले...!" देऊळगाव राजा अजून तहानलेला, नळ अजूनही शांत उभे... पण फाईलींच्या प्रवाहामध्ये काही चेहरे मात्र खूपच भिजलेले दिसे... ३४ कोटींचा झाला गजर, सभांमध्ये शब्द वाहत गेले... जनतेच्या ओठांवर प्रश्नच राहिले, आणि काही हात बहुधा धुऊन गेले... रस्ते खोदले, पाईप टाकले, धुळीत शहर हरवून गेलं... पण पाणी येण्याआधीच बहुतेक काहींचं गणित जुळून गेलं... "नळात पाणी नाही, पण आश्वासनांचा पूर आला, जनतेचा विश्वास मात्र हळूहळू कोरडा झाला..." फिल्टर प्लांटही गप्प उभा, त्यालाही कदाचित उत्तर नसेल... कारण तहान शहराची भागवताना मध्येच कुठेतरी 'प्रवाह' वळला असेल... कोणी म्हणाले "योजना आमची", कोणी म्हणाले "निधी आम्ही आणला"... पण नागरिक म्हणू लागले आता — "मग आमच्या नळात थेंब कुणी अडवला

## आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी शिक्षकावर गुन्हा दाखल

**▸विदर्भ केसरी। भिगवण**

राष्ट्रीय जनगणना २०२७ च्या अत्यंत महत्त्वाच्या आणि सक्तीच्या शासकीय कामाकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एका जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकावर भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय आदेश धुडकावून लावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल झाल्याने महसूल आणि शिक्षण वर्तुळात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मौजे पोंधवडी (ता.इंदापूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत असलेले शिक्षक किशोर हनुमंत खाडे यांची आगामी राष्ट्रीय जनगणना २०२७ च्या कामासाठी 'प्रगणक' म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना मदनवाडी गावच्या हद्दीतील जनगणनेचे काम सोपवण्यात आले होते. मात्र, दिनांक १६ मे ते २८ मे २०२६ या कालावधीत शिक्षक किशोर खाडे हे जनगणनेच्या कामावर गैरहजर राहिले आणि त्यांनी हे महत्त्वपूर्ण शासकीय काम करण्यास स्पष्ट नकार दिला. खाडे हे कामावर हजर होत नसल्याचे पाहून ग्राममहसूल अधिकारी तथा जनगणना सुपरवायझर बजरंग केशव सोनवले यांनी त्यांना वारंवार फोनवरून सूचना दिल्या. इतकेच नव्हे तर, जनगणनेच्या कामावर तत्परतेने रुजू होण्याबाबतचे लेखी आदेश आणि शासकीय सूचना त्यांच्या व्हॉट्सॲप संदेशाद्वारे देखील पाठवण्यात आल्या होत्या. मात्र, या सर्व सूचनांना केराची टोपली दाखवत खाडे यांनी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केले नाही. शासकीय कामात अडथळा आणि आदेशाची पायमल्ली होत असल्याचे पाहून अखेर जनगणना सुपरवायझर बजरंग सोनवले यांनी थेट भिगवण पोलीस ठाणे गाठून या शिक्षकाविरोधात अधिकृत तक्रार दिली. त्यानुसार पोलिसांनी शिक्षक किशोर हनुमंत खाडे याच्याविरुद्ध जनगणना अधिनियम १९४८ चे कलम ११(१) (२) तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम २२३ अ (शासकीय आदेशाचे उल्लंघन करणे) नुसार कायदेशीर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास भिगवण पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार महेश उगले करत आहेत.

# रुग्णालयाला कर्मचाऱ्यांकडून 'वॉटर कुलर' भेट

## विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात, अमरावती येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी;

**▸विदर्भ केसरी। परतवाडा**



स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात ( सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल) अमरावती येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विशेष म्हणजे, रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेत या कार्यक्रमाचे नेटके आयोजन केले होते. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दिव्यांनी मुंदाने होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. माधुरी गाडेकर उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या लोककल्याणकारी कार्यास अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आणि कार्य आपल्या भाषणातून अधोरेखित केले.

■ **'वॉटर कुलर'ची भेट:**

उन्हाळ्याचे दिवस आणि रुग्णांची गरज लक्षात घेता, रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी जयंतीनिमित्त रुग्णालयात एक लोकोपयोगी उपक्रम राबवण्याची संकल्पना मांडली होती. त्यांच्या या संकल्पनेला रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत, स्वतःहून निधी गोळा करून रुग्णालयाला एक 'वॉटर कुलर' भेट दिला. यामुळे रुग्णालयात येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे. महिलांनी केलेले उत्कृष्ट नियोजन आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक दातृत्वामुळे या जयंती महोत्सवाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाला रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, प्रशासकीय कर्मचारी व चतुर्थश्रेणी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पांढरकवड्यात अवकाळी पावसाचा तडाखा

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा,**

शहराला रविवार, 31 मे रोजी अवकाळी पाऊस आणि जोरदार वादळी वाऱ्याने अक्षरशः झोडपून काढले. अचानक आलेल्या पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शहरातील अनेक भागांत मोठे नुकसान झाले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी वाऱ्याच्या तडाख्याने शहरातील अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. अनेक ठिकाणी झाडांच्या मोठ्या फांद्या रस्त्यावर तसेच वाहनांवर कोसळल्याने वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शहराच्या विविध भागांत 25 ते 30 चारचाकी आणि 40 ते 50 दुचाकी वाहनांचे नुकसान झाले असल्याचे आढळून आले. शहराच्या काही भागांत घरांवरील टिनपत्रे उडून गेल्याने नागरिकांची मोठीच धावपळ झाली. अनेक भागांत वीजतारा तुटल्याच्या घटना घडल्या असून काही ठिकाणी विजेचे खांबही कोसळल्याचे समोर आले आहे.

# उमरखेड, राळेगाव आगाराची बाजी

## आज गौरव : " हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

राज्य परिवहन महामंडळाने घेतलेल्या " हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे " स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत जिल्ह्यातील नऊ आगारांपैकी दोन आगार पात्र ठरले असून त्यांना अमरावती येथे सोमवारी (ता.१) गौरव करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री तथा एसटी महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष यांच्या संकल्पनेतून राज्यातील एसटी महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर " हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे " स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान " राबविले गेले. लोकसहभागातून बसस्थानकाचा विकास या संकल्पनेवर आधारित राबविण्यात आलेल्या या अभियानामध्ये स्थानिक लोकांच्या सहकार्यातून बसस्थानक व बसस्थानक परिसराचे सुशोभिकरण,

### वाहतूक नियंत्रकाचा मंत्र्यांच्या हस्ते होणार सन्मान

■ **रा. प. महामडळातील उत्कृष्ट, उल्लखनीय कार्य करणा-या अधिकारी/कर्मचारी यांचा गुणगौरव करण्याच्या उद्देशाने मंत्री परिवहन तथा अध्यक्ष म.रा.मा.प. महामंडळ यांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी दादर, मुंबई येथे समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे. करीता उमरखेड आगारातील वाहतूक नियंत्रक दिगांबर बापुजी पारवेकर यांना दि. ०१ जून २०२६ रोजी महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्य आयोजित कार्यक्रमात गौरव करण्यात येणार आहे.**

आकर्षक रंगरंगोटी, मोकळ्या जागेमध्ये बागबगीचा, वृक्षरोपण, प्रवाशांसाठी बसस्थानकांवर वॉटरकुलर, घड्याळ, सेल्फीपॉईंट, तयार करण्यात आले. प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा, बसेसच्या स्वच्छते बरोबरच त्यांची तांत्रिक दुरूस्ती देखभाल या सर्व घटकांचा विचार करून वर्षभरात वेगवेगळ्या सर्वेक्षण समितीच्या माध्यमातून बसस्थानकांचे मूल्यांकन करण्यात आले. या मूल्यांकनात दिलेल्या गुणांच्या सरासरीच्या आधारे बसस्थानकांची बक्षीसासाठी निवड करण्यात आली आहे.

यात यवतमाळ जिल्ह्यातील नऊही आगारातील बसस्थानकाने उत्स्फुर्त सहभाग नोंदविला होता. त्यापैकी उमरखेड, राळेगाव आगाराने बाजी मारीत पात्र ठरले आहे. या आगारप्रमुखांचा अमरावती प्रादेशीक व्यवस्थापक यांच्या हस्ते उद्या अमरावती येथे गौरव केला जाणार आहे.

# रक्तदानाने राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



येथील स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीचे औचित्य साधून ३० मे २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तालुक्यातील व शहरातील ४२ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून राजमातांना आगळेवेगळे अभिवादन केले. मूर्तिजापूर तालुका धनगर समाज संघटना व कर्मचारी संघटनेच्या वतीने आयोजित हे शिबीर अत्यंत यशस्वी रीतीने संपन्न झाले. प्रतिमा पूजन आणि मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी आमदार हरिदास भदे यांच्या हस्ते झाले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरविंद गाडवे होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून आमदार हरीश पिंपळे उपस्थित होते. तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महादेवराव साबे, विष्णुपंत चुडे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिनकरराव नागे, डॉ. वसंतराव मुरळ, डॉ. सुरेश बचे, दूध संघाचे अध्यक्ष प्रशांत हजारी, नगराध्यक्ष हर्षेल साबळे, डॉ. हरीश पातोंड, विलास ईसळ, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष सुरेश जोगळे आणि नगरपरिषद सभापती पूनम रवींद्र माडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत अभिजित भागवत (शिक्षक) यांनी प्रथम रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली. राजमातांचा लोककल्याणकारी राज्यकारभार व रक्तदानाचा संदेश यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी आमदार हरीश पिंपळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

उद्घाटक माजी आमदार हरिदास भदे यांनी अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराची पद्धत, त्यांची चोख शासन व्यवस्था, न्यायदान पद्धती, लोककल्याणकारी योजना आणि त्यांच्या अफाट दानशूरतेविषयी सविस्तर माहिती दिली. यासोबतच त्यांनी आजच्या काळात रक्तदान चळवळीचे काय महत्त्व आहे, हे उपस्थितांना पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. एल. डी. सरोदे यांनी करून दिला, तर कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन विष्णूभाऊ लोडम यांनी केले. मान्यवरांच्या भेटी व शुभेच्छांचा वर्षाव. दिवसभर चाललेल्या या शिबिरास शहरातील अनेक नामांकित व्यक्तींनी व कार्यकर्त्यांनी भेटी देऊन रक्तदात्यांचा उत्साह वाढवला. यामध्ये माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुनील सरोदे,प्रा. बाळासाहेब सरोदे, प्रा. गजानन जोगळे, दिलीप पंडित, गटनेते गजानन नाकट, नगरसेवक पंकज कांबे, राम खंडारे, नंदकिशोर राऊत, भूषण कोकाटे, भारत जेठवाणी, माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे, नगरसेवक कैलास महाजन, तालुकाध्यक्ष गजानन चौधरी, बाळासाहेब खांडेकर, भास्कर पातुर्डे शिक्षक राहुल रोकडे , सचिन दिवनाले, शाम अवघड, सुरेंद्र भेलोंडे, गिरीश अवघड, मंगेश तांबडे, राहुल तिडके, नितीन भागवत, अभीजीत भागवत, डॉ. महेंद्र नवघरे, विष्णूभाऊ लोडम, सुनील शितोळे, विनोद कडू, गुलाबराव म्हसाये, निलेश सरोदे, मोहन सरोदे, गजानन चव्हाण,विलास वानखडे, रवींद्र गोंडकर,प्रा वर्घट,शिक्षक विनोद देवके आदी मान्यवरांचा समावेश होता.

■ **आयोजकांचे अथक परिश्रम**

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मूर्तिजापूर तालुका धनगर समाज संघटना व कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. यामध्ये प्रा. एल. डी. सरोदे, सुनील पंडित (शिक्षक), अभिषेक गाडवे, अनिल लाखे, निखिल गाडवे, रवीभाऊ माडकर, आशिष कोल्हे, वैभव काळे, अक्षय भागवत, चेतन तांबडे, श्रीकृष्ण गाडवे, वैभव पिंगळे आणि तनय शितोळे यांनी अथक परिश्रम घेऊन शिबिराच्या नियोजनात मोलाचे योगदान दिले. एका सामाजिक उपक्रमाने जयंती साजरी केल्याबद्दल मूर्तिजापूर परिसरात या उपक्रमाचे मोठे कौतुक होत आहे.

## २०० हून अधिक गोवंश हत्या प्रकरणात गुन्हा दाखल : दोघांना अटक

**▸विदर्भ केसरी। माजलगाव :**

माजलगाव शहरात बकरी ईदच्या दिवशी २०० हून अधिक गोवंशांची हत्या झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आल्यानंतर शनिवारी रात्री उशिरा यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असुन यात दोन आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणात गोवंश हत्या झाल्याची माहिती विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी गेल्या आठ दिवसांपासून व बकरी ईदच्या पहिल्या दिवशी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना लोकेशन पाठवूनही यावर काहीच कारवाई केली नाही असा आरोप केला जाऊ लागला होता. यानंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी शनिवारी पोलिसांना याबाबत निवेदन दिल्यानंतर शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट व घटनेचा पंचनामा करून रात्री गोष्टीला अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक पुराव्याच्या आधारे दोन आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये जफर गफर कुरेशी (वय २५) व इम्रान शकील कुरेशी (वय ३३) रा . खाटीक गल्ली माजलगाव यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत शहर पोलिसांना लोकेशन देऊनही एवढ्या गाईंची कत्तल झालेली असताना येथील शहर पोलिसांनी याची साधी दखलही घेतली नव्हती. या विरोधात काही सामाजिक संघटनांनी आवाज उठवत आंदोलनाचा इशारा दिला होता यानंतर पोलिसांना जाग आली व पोलिसांनी शनिवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली.

चंद्रपूर
BREKING NEWS
TODAY GOOD MORNING
दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
। सोमवार, दि. 1 जून 2026 ।


Selected

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात साजरी



मंगरूळनाथ: मंगरूळनाथ येथील दत्त मंदिराच्या सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी वाशिम-मंगरूळनाथ मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनीही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी वक्त्यांनी सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती, त्याग, समाजप्रबोधन आणि स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या विचारांचे आजच्या पिढीने अनुकरण करून राष्ट्रनिर्माणासाठी कार्य करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. कार्यक्रमात देशभक्तीपर भाषणांनी वातावरण भारावून गेले. या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष अभिषेक दंडे, डॉ. जयंत पिंपरकर, अरुण सागोळे, नगरसेवक सुधीर घोडचर, श्रीपाद जागीरदार, प्रबोध महाजन, महेश टांग, बाळू दिवेकर, बाळू घोडचर, जयंत जहागीरदार, डॉ. दिलीपजी रत्नपारखी, श्रीकांत मुळे, शशांक बडगे, मुकुंद दंडे, मुकुंद कुळकर्णी, प्रशांत दयाळ, मंगेश कुलकर्णी, सुनील देशमुख, हेमंत देशमुख, गजानन सरजोशी, प्रदीप कांत, अविनाश पांडे, गणेश राऊत, मकरंद महाजन, ऋषिकेश महाजन, मनोज सांगोळे, प्रमोद घोडचर, सतीश दीक्षित, शंकर थोरात, मुकेश शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी; रुचिता मुंदाने यांचा सन्मान



लोणी टाकळी, दि. 31 मे 2026 : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालय, लोणी टाकळी येथे उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास ग्रामपंचायतच्या मा. प्रशासक सौ प्रतिक्षा जिवन आखरे, प्रशासक समितीचे सदस्य ,जीवन आखरे,ग्राम पंचायत अधिकारी डी. एस. बरदिये, दिपक लोहकरे (माजी उपसरपंच ) लिपिक तुळशीदास गोळंबे,अक्षय मुंदाने, दीपक गादे,राजू पवार, सुनिल सातंगे, अरुण राऊत सौ ऱश्मी गणेश कळसकर, विठ्ठल माहोरे तसेच आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण केले. यावेळी सामाजिक कार्य तसेच अवयवदान देहदान चळवळ, स्वच्छ भारत अभियान, पर्यावरण संवर्धन, आंतरराष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सवात करत असलेल्या निस्वार्थ कार्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन सौ रुचिता आकाश मुंदाने यांचा मा. प्रशासक सौ. प्रतिक्षा आखरे यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला .

# गडचिरोलीत रानटी हत्तींचा धुमाकूळ : शेतकऱ्यांचे नुकसान..!

### वनविभागाकडून पंचनाम्यास दिरंगाई; शेतकरी संतप्त

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे



गडचिरोली :- तालुक्यातील नगरी येथे रानटी हत्तींच्या कळपाने शेतात अचानक शिरकाव करून धुमाकूळ घातल्याची धक्कादायक घटना शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. हत्तींच्या या हल्ल्यामुळे स्थानिक शेतकरी मनोहर कुंभारे यांचे अंदाजे १ ते दीड लाख रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण आहे.

शेतकरी मनोहर कुंभारे यांनी रानटी जनावरांपासून आपल्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी संपूर्ण शेताभोवती लाखो रुपये खर्चुन जाळीचे मजबूत फेन्सिंग (कुंपण) लावले होते. मात्र, पहाटेच्या सुमारास आलेल्या रानटी हत्तींनी हे लोखंडी कुंपण आणि काँक्रीटचे मजबूत खांब पूर्णपणे तोडून शेतात प्रवेश केला. शिरल्यानंतर हत्तींनी आंबे लागलेल्या अनेक झाडांची मोठी मोडतोड केली, तसेच बांबूची झाडेदेखील मुळासकट उपटून टाकली. या संपूर्ण हैदोसात शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. वनविभागाकडून पंचनाम्यास दिरंगाई; शेतकरी संतप्त या घटनेची माहिती मिळताच शेतकरी कुंभारे यांनी तातडीने शनिवारी सकाळी वनपरिक्षेत्र अधिकारी पाचभाई यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. मात्र, दुपार उलटून गेल्यानंतरही वनविभागाचे कोणतेही पथक किंवा कर्मचारी घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी पोहोचले नाही. वनविभागाच्या या उदासीन आणि धीम्या कारभारामुळे बाधित शेतकऱ्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

#### माणसाला मोल नाही का? शेतकऱ्यांचा उद्विग्न सवाल..!

आपली व्यथा मांडताना पीडित शेतकरी मनोहर कुंभारे म्हणाले, आम्ही हत्ती किंवा इतर कोणत्याही वन्यप्राण्यांच्या विरोधात नाही. आम्ही त्यांना स्वतःहून कोणतीही इजा पोहोचवू शकत नाही, कारण तसे केल्यास आमच्यावर कायदेशीर कारवाई होईल किंवा थेट फाशीला सामोरे जावे लागेल. मग आमच्या पिकांच्या आणि जगण्याच्या संरक्षणाची जबाबदारी कोणाची? वनविभागाने या प्राण्यांचे काहीतरी योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. हत्तीने एखाद्या माणसाला मारल्यानंतर शासन केवळ काही रुपयांची नुकसानभरपाई देते, पण गेलेला माणूस परत येत नाही. त्यामुळे या देशात माणसाला मोल आहे की जनावराला, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

## खेळतांना सोफ्यावरून पडल्याने चिमुकल्याचा मृत्यू..!




विदर्भ केसरी । गोंदिया

मामाच्या घरी खेळतांना सोफ्यावरून पडल्याने डोक्याला मार लागून सहा वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू झाला. तिरोडा पोलिस ठाण्यांतर्गत शहरातील गंज मार्केट परिसरात शुक्रवारी (दि.२९) मध्यरात्री २ वाजता दरम्यान उघडकीस आली. हेरीश आनंद लांजेवार (६, रा. इंगळे चौक, सिव्हिल लाइन्स, गोंदिया) असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. हेरीश लांजेवार हा गंज मार्केटमधील रहिवासी आपल्या मामाकडे राहण्यासाठी गेला होता. गुरुवारी (दि.२८) रात्री ९ वाजता दरम्यान घरात खेळतांना तो सोफ्यावरून खाली पडल्याने त्याच्या डोक्याला मार लागला व खेळत असल्याने त्याच्याकडे कुणी लक्ष दिले नाही. तिरोडा पोलिस ठाण्यांतर्गत शहरातील गंज मार्केट परिसरात शुक्रवारी (दि.२९) मध्यरात्री २ वाजता दरम्यान उघडकीस आली. हेरीश आनंद लांजेवार (६, रा. इंगळे चौक, सिव्हिल लाइन्स, गोंदिया) असे मृत चिमुकल्याचे नाव आहे. मात्र शुक्रवारी (दि.२९) रात्री २ वाजता दरम्यान तो काहीच हालचाल करीत नसल्याचा फोन त्याचे वडील फिर्यादी आनंद राजेंद्र लांजेवार (३६, रा. इंगळे चौक, सिव्हिल लाइन्स, गोंदिया) यांना केल्यावर ते पत्नी सोबत तिरोडा येथील शासकीय दवाखान्यात गेले असता डॉक्टरांनी हेरीशचा मृत्यू झाल्याचे सांगितले. तिरोडा पोलिसांनी प्रकरणाची नोंद केली आहे.

## कर्जमाफी अन् नव्या कर्जाची प्रतीक्षा बळीराजा चिंतेत..?

विदर्भ केसरी । गडचिरोली



**किनवट ता.प्र.!डॉ.भारत राठोड राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी संथ गतीने सुरू असल्याने किनवट आदिवासी तालुक्यातील अनेक परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. खरीप हंगाम अगदी काही दिवसांवर आला असताना कर्जमाफी प्रक्रिया व नवीन पीक कर्ज वितरणाबाबत शेतकरी अनिश्चिततेत आहेत. राज्य सरकारने थकीत पीककर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, तसेच नियमित पीककर्जधारकांना ५० हजार रुपये खरीप तोंडावर; कर्जमाफी आणि नव्या पीक कर्जाची प्रतीक्षा, शेतकरी चिंतेत प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा केली होती. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात यासाठी तरतूदही करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी वेगाने न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे. खरीप हंगाम जवळ येत असताना बाजारात रासायनिक खतांचे दर वाढले असून, बियाणे व इतर शेतीनिविष्ठांसाठी भांडवल उभे करणे कठीण झाले आहे. जुन्या कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळण्यात अडचणी येत असल्याचेही चित्र आहे.**

**कर्जमाफीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पेरणीपूर्वी शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी अनेक परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. पेरणीसाठी वेळेवर पीककर्ज मिळाले नाही तर शेतकऱ्यांची मोठी अडचण होईल.**

## तळोधी वनपरिक्षेत्रांतर्गत जंगल परिसरात वाघाच्या हल्ल्यात एका गुराख्याचा मृत्यू..!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

चिमुर :- तळोधी वनपरिक्षेत्रांतर्गत मोटेगाव जंगल परिसरात पट्टेदार वाघाच्या हल्ल्यात एका गुराख्याचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी उघडकीस आली. दिलीप जानबा ननावरे वय, 45 वर्ष रा. मोटेगाव असे मृतकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाघाचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वनविभागाच्या माहितीनुसार, मोटेगाव ते पेंढरी मार्गावरील बद्री पहाडी परिसरातील कक्ष क्रमांक 38 मध्ये ननावरे हे नेहमीप्रमाणे बकऱ्या चारण्यासाठी गेले होते. सकाळी 10:00 वाजण्याच्या सुमारास जंगलात दबा धरून बसलेल्या वाघाने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर वाघाने मृतदेह सुमारे 500 मीटर अंतरापर्यंत ओढत नेल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. ननावरे यांच्यासोबत असलेल्या बकऱ्या सैरावैरा पळाल्यानंतर घरी परतल्या. ननावरे घरी न परतल्याने त्यांच्या मुलाने त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. प्रतिसाद न मिळाल्याने तो काही मुलांसह जंगल परिसरात शोध घेण्यासाठी गेला. यावेळी घटनास्थळी फाटलेले कपडे आणि कुऱ्हाड आढळून आली. त्यानंतर गावकऱ्यांनी शोधमोहीम राबविल्यानंतर मृतदेह घटनास्थळापासून सुमारे 500 मीटर अंतरावर आढळून आला.

स्थानिकांच्या माहितीनुसार, याच परिसरात सकाळी आठच्या सुमारास वाघ दिसल्याचे काही महिला मजूर



तसेच नागरिकांनी सांगितले होते. रोपवाटिकेजवळ रस्ता ओलांडताना वाघ दिसल्याची माहितीही समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी अनुप कन्नमवार,सहाय्यक वनसंरक्षक महेश गायकवाड,वनरक्षक केशव पाटील, संभाजी वडझे, बाळकृष्ण नागरे यांच्यासह वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच पोलिस निरीक्षक दिनेश लबडे यांनीही पथकासह भेट देऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मृतक दिलीप ननावरे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे सांगितले जाते. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेमुळे मोटेगाव आणि परिसरातील गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करून वाघाचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या घटनेनंतर वनविभागाने मृताच्या कुटुंबीयांना तातडीची 50 हजार रुपयांची आर्थिक मदत प्रदान केली आहे. उर्वरित अनुदानाची रक्कम शासनाच्या नियमानुसार लवकरच देण्यात येईल, अशी माहिती वनविभागाने दिली.

## फडणवीस यांच्या पुढाकारातून धानोरा-एटापल्लीत २० हजार धुररहित चुलींचे वितरण..!

विदर्भ केसरी । गडचिरोली

गडचिरोली :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शन व पुढाकारातून गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा व एटापल्ली या दुर्गम, आदिवासी तालुक्यांमध्ये राबविण्यात आलेल्या धुररहित चुल उपक्रमाला उल्लेखनीय यश मिळाले असून आतापर्यंत २० हजार धुररहित चुलींचे वितरण पूर्ण करण्यात आले आहे. क्लीन मॅक्स उर्जित एलएलपी आणि क्लायमेटसेन्स प्रायव्हेट लिमिटेड (फार्मर्स फॉर फॉरेस्ट समूह) यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेला हा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शाश्वत विकास आणि पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनेला बळ देणारा ठरत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत धानोरा व एटापल्ली भागात राबविण्यात आलेला हा प्रकल्प आदिवासी कुटुंबांच्या जीवनमानात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारा असल्याचे म्हटले आहे. या धुररहित चुलींमुळे घरातील धूर आणि वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी



होत असून जळाऊ लाकडावरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या घटले आहे. परिणामी महिलांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत असून जंगलांवरील ताण कमी होऊन वनसंवर्धनाला चालना मिळत आहे. हा यशस्वी उपक्रम राज्यातील इतर आदिवासी जिल्ह्यांमध्येही राबविण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतो, असेही त्यांनी नमूद केले आहे. या प्रकल्पाच्या परिणामांचा आढावा घेतला असता शंभर टक्के लाभार्थी कुटुंबांनी घरातील धूर आणि वायुप्रदूषणात लक्षणीय घट झाल्याचे सांगितले आहे.

त्यामुळे महिलांमध्ये व बालकांमध्ये आढळणाऱ्या श्वसनविकार, डोळ्यांची जळजळ तसेच धुरामुळे उद्भवणाऱ्या इतर आरोग्य समस्यांमध्ये घट होण्यास मदत होत आहे. स्वच्छ आणि धुररहित स्वयंपाकघरामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांच्या जीवनमानातही लक्षणीय सुधारणा होत आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी देखील हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे.

सुमारे ९५ टक्के कुटुंबांनी स्वयंपाक आणि जळाऊ लाकूड गोळा करण्यासाठी लागणाऱ्या वेळेत मोठी बचत झाल्याचे नोंदविले आहे. यापूर्वी अनेक महिलांना दररोज जंगलात जाऊन सरपण गोळा करावे लागत होते. सुधारित चुलींच्या वापरामुळे जळाऊ लाकडाची गरज कमी झाल्याने जंगलात जाण्याचे प्रमाण घटले आहे. परिणामी महिलांचा वेळ आणि श्रम वाचत असून त्यांना कुटुंब, शिक्षण, स्वयंरोजगार आणि इतर उपजीविकेच्या कामांसाठी अधिक वेळ देता येत आहे. या चुली धुररहित, इंधन बचत करणाऱ्या आणि वापरण्यास सुलभ असल्याने दुर्गम भागात कमी खर्चात स्वच्छ, सुरक्षित आणि शाश्वत स्वयंपाकाची सुविधा उपलब्ध होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागात स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढण्यास मदत होत आहे.

## गडचिरोली आरोग्य सेवेचे ऐतिहासिक पाऊल

### दुर्गम भागातील महिलांना अत्याधुनिक कुटुंब नियोजन सुविधेचा लाभ..!

विदर्भ केसरी । गडचिरोली

दुर्गम आणि आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यात अत्याधुनिक आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या दिशेने आरोग्य विभागाने ऐतिहासिक पाऊल टाकत मुलचेरा ग्रामीण रुग्णालयात एकाच दिवसात तब्बल 27 मातांवर 'सिंगल पंक्चर लॅप्रोस्कोपिक ट्युबल लिगेशन' अर्थात दूरबीनद्वारे कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्या. जिल्हा तसेच मुलचेरा तालुक्यात अशा प्रकारच्या अत्याधुनिक शस्त्रक्रियांचे हे पहिले मोठे यश ठरले असून, आरोग्य सेवेच्या क्षेत्रात हा एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड मानला जात आहे.

या विशेष मोहिमेचे नेतृत्व जिल्हा शल्यचिकित्सक तथा स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. वर्षा लहाडे यांनी केले. विशेष म्हणजे,



त्यांनी केवळ मार्गदर्शन न करता स्वतः सर्व 27 शस्त्रक्रिया अत्यंत कौशल्याने आणि यशस्वीरित्या पूर्ण करत आरोग्य विभागाच्या सेवाभावी कार्याचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ चमूने ही मोहीम यशस्वी करून दाखवली.

या उपक्रमात डॉ. स्मिता साळवे यांनी सक्रिय सहभाग घेत शस्त्रक्रियांच्या यशात मोलाचे योगदान दिले, तर भूलतज्ज्ञ डॉ. समीर बनसोडे यांनी आवश्यक भूलसेवा देत महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच सुंदरनगर प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पात्र महिलांपर्यंत पोहोचून त्यांचे समुपदेशन करत शस्त्रक्रियेसाठी प्रोत्साहित केले.

#### काय आहे 'सिंगल पंक्चर' दूरबीन शस्त्रक्रिया?

'सिंगल पंक्चर लॅप्रोस्कोपिक' शस्त्रक्रिया ही आधुनिक आणि सुरक्षित कुटुंब नियोजन पद्धती मानली जाते. या प्रक्रियेत पोटावर केवळ एक लहान छिद्र करून दूरबीनच्या सहाय्याने शस्त्रक्रिया केली जाते. त्यामुळे रक्तस्त्राव अत्यल्प होतो, टाके पडत नाहीत, वेदना कमी होतात आणि रुग्ण लवकर बरे होऊन दैनंदिन जीवनात परतू शकतात. विशेषतः दुर्गम व आदिवासी भागातील महिलांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरत आहे. याबाबत बोलतांना डॉ. वर्षा लहाडे यांनी सांगितले की, "महिलांना सुरक्षित, प्रभावी आणि कमी त्रासदायक कुटुंब नियोजन सेवा उपलब्ध करून देणे हे आरोग्य विभागाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मुलचेरा येथे मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे भविष्यात जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे." मुलचेरा ग्रामीण रुग्णालयातील या यशस्वी उपक्रमानंतर आता संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात 'सिंगल पंक्चर लॅप्रोस्कोपिक' कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरांचा विस्तार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक दुर्गम व आदिवासी भागातील महिलांपर्यंत अत्याधुनिक आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी विशेष मोहिमा राबविण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य प्रशासनाने दिली आहे.

मुलचेरा ग्रामीण रुग्णालयातील परिचारिका, आरोग्य कर्मचारी आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनीही उत्कृष्ट समन्वय साधत या शिबिराच्या यशात महत्त्वाचा वाटा उचलला. त्यांच्या प्रयत्नांमुळे एकाच दिवसात मोठ्या संख्येने शस्त्रक्रिया सुरक्षित, यशस्वी आणि निर्विघ्नपणे पार पाडणे शक्य झाले.

## सोशल मीडियावर झालेल्या मैत्रीचे रक्तरंजित गुन्ह्यात रुपांतर


### लग्नास नकार दिल्याच्या रागातून गळा चिरून निर्घृण खून..!

विदर्भ केसरी । गडचिरोली

सोशल मीडियावर झालेल्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत, त्यानंतर प्रेमसंबंधांत आणि अखेरीस रक्तरंजित गुन्ह्यात झाल्याची धक्कादायक घटना एटापल्ली तालुक्यात उघडकीस आली आहे. लग्नास नकार दिल्याच्या रागातून एका युवकाने आपल्या मित्रावर चाकूने सपासप वार करत त्याचा गळा चिरून निर्घृण खून केल्याची घटना रविवारी सकाळी देवदा गावाजवळ घडली. या प्रकरणातील आरोपीला नागरिकांनी तत्परता दाखवत पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

मृत युवकाचे नाव सतीशकुमार जगदीशप्रकाश निसाद (३२, रा. नागेपल्ली, ता. अहेरी) असे असून, सूरज हलदार (३०, रा. मिरगन, ता. रायघर, जि. नबरंगपूर, ओडिशा) असे आरोपीचे नाव आहे. ही घटना एटापल्लीपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावरील हालेवारा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवदा गावाजवळ घडली. इन्स्टाग्रामवरील ओळखीचे प्रेमसंबंधांत रूपांतर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सतीशकुमार याचा नागेपल्ली येथे गॅरेज व्यवसाय आहे. काही महिन्यांपूर्वी त्याची आणि सूरज हलदारची 'इन्स्टाग्राम'च्या माध्यमातून ओळख झाली होती. या ओळखीचे पुढे मैत्रीत आणि नंतर घनिष्ठ संबंधांत रूपांतर झाले. दरम्यान, सूरज याने सतीशकुमारकडे लग्नाची मागणी घातली होती. मात्र, सतीशकुमार हा विवाहित असल्याने त्याने त्यास नकार दिला होता. दोन दिवसांपूर्वी सूरज हा सतीशकुमारला भेटण्यासाठी ओडिशाहून नागेपल्ली येथे आला होता.

त्यावेळी सतीशकुमार विवाहित असल्याची माहिती त्याला मिळाली. रविवारी पहाटे सूरज आपल्या गावी परतण्यासाठी निघाला होता. त्याला सोडण्यासाठी सतीशकुमार आपल्या चारचाकी वाहनातून छत्तीसगड सीमाभागाच्या मार्गे ओडिशाच्या दिशेने जात होता. प्रवासादरम्यान देवदा गावाजवळ पोहोचल्यानंतर दोघांमध्ये सतीशकुमारच्या वैवाहिक स्थितीवरून तीव्र वाद झाला. त्यानंतर संतप्त झालेल्या सूरजने सोबत आणलेल्या चाकूने सतीशकुमारवर वार केले. गंभीर जखमी झालेल्या सतीशकुमारचा घटनास्थळीच मृत्यू झाला. नागरिकांच्या धाडसाने आरोपी जेरबंद घटनेनंतर आरोपी पसार होण्याच्या तयारीत असताना परिसरातील नागरिकांनी प्रसंगावधान राखत त्याला पकडले. त्यानंतर पोलिसांना माहिती देऊन आरोपीला त्यांच्या ताब्यात देण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला.





# इंधन दरवाढ, धान खरेदी आणि ‘नीट’ पेपरफुटी विरोधात काँग्रेसची निदर्शने..!

## आ. मसराम यांच्या नेतृत्वात हुतात्मा स्मारकासमोर सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी..!

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

देसाईगंज :- केंद्रातील व राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या जनविरोधी धोरणांविरोधात आणि सर्वसामान्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी रविवारी दि.३१ मे रोजी देसाईगंज येथे काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस कमिटी तसेच काँग्रेसच्या विविध विभाग व सेलच्या वतीने भव्य निदर्शने करण्यात आली. येथील ऐतिहासिक हुतात्मा स्मारक परिसरात पार पडलेल्या या आंदोलनाचे नेतृत्व आरमोरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार रामदास मसराम यांनी केले. या आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी इंधन दरवाढ, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि नुकत्याच गाजलेल्या शैक्षणिक घोटाळ्यांवरून सरकारच्या धोरणांचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. आंदोलनादरम्यान मुख्यत्वे इंधन दरवाढ व टंचाई सातत्याने वाढणारी इंधन दरवाढ रोखून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा आणि इंधनाची टंचाई तात्काळ दूर करावी. शेतकऱ्यांच्या धान आणि मका खरेदीचे उद्दिष्ट





लवकरात लवकर पूर्ण करून, शेतकऱ्यांचे बरेच दिवस प्रलंबित असलेले चुकारे (पेमेंट) तात्काळ त्यांच्या बँक खात्यात जमा करावेत. ‘नीट’ (NEET) परीक्षा घोटाळा - देशभरातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी.

या प्रमुख मागण्यांवर प्रशासनाचे आणि सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

या आंदोलनात जिवन नाट, परसराम टिकले, राजेंद्र बुल्ले, मिलिंद खोब्रागडे, प्रभाकर तुलावी, जयंत हरडे, नितीन राऊत, गिरीधर तितराम, दिलीप घोडाम, इलियास पठाण, प्रकाश समर्थ, गजानन सेलोटे, कैलास राणे, अरुण कुंभरवार, नरेंद्र गजपुरे, संजय करांनकर, नेताजी ठाकरे, डोमा दिवठे, गुलाब नंदेश्वर, रमाकांत भर्रे, अमर भर्रे, प्रांजल धाबेकर, सागर वाढई, कैलास वानखेडे, मनोहर खेकारे, कमलेश बारस्कर, सागर बन्सोड, होमराज हारगुडे, हंसराज लांडगे, हिरामण कुळमेथे, प्रकाश सांगोडे, मेघराज बुराडे, परशुराम ठाकरे, प्रमोद पत्रे, भूमेश्वर शिंगाडे, शैलेंद्र बगमारे, ऋषी बगमारे, व्यंकट पेंदाम, श्रीराम सोरते, महेंद्र खरकाटे, गजेंद्र नाईक, यशवंत जुमनाके, भावेश मुंगणकर, प्रशांत अंकमवार, मुन्ना शेख, कैलास बगमारे, जुबेर शेख, आक्रोश शेंडे, पवन गेडाम, पंकज चांहादे, मुजीब शेख, जगन पर्वते, राकेश निमकर, नेताजी बुराडे, श्रीहरी कन्नाके, सागर शेंडे, उमाकांत भर्रे, तेजराम नंदेश्वर, श्रीहरी ठाकरे, दिलीप कुळमेथे, हरिदास बगमारे, राजकुमार मेश्राम, शरीफ भाई, सुनील बुराडे, रियाजुल शेख, अजीम खान, जब्बार शेख, सादिक शेख, डोमाजी दिवटे, बंडू तांबे, अश्विन मुळे व देवानंद सहारे उपस्थित होते.

सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराशी निगडित असलेल्या महागाईच्या मुद्द्यावर काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनीही या आंदोलनात सरकारला धारेवर धरले. यामध्ये प्रामुख्याने राणी शेख, गंधर्व मेश्राम, आर. एम. राऊत, अर्पणा राऊत, जयमाला पेंदाम, मंदा समर्थ, वैष्णवी आकरे, आशा झोडे, शालू नंदेश्वर, सुनीता चौधरी, सीमा टेंभुर्णे, सुशीला गजभिये, हाजरा शेख आणि सुरेखा ढोरे यांच्यासह शेकडो महिला कार्यकर्त्या आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चुकारे (पेमेंट) तात्काळ त्यांच्या बँक खात्यात जमा करावेत

शेतकऱ्यांचेप्रश्नआणिनुकत्याचगाजलेल्याशैक्षणिकघोटाळ्यांवरूनसरकारच्याधोरणांचातीव्र शब्दांत निषेध नोंदवला. आंदोलनादरम्यान मुख्यत्वे इंधन दरवाढ व टंचाई सातत्याने वाढणारी इंधन दरवाढ रोखून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा आणि इंधनाची टंचाई तात्काळ दूर करावी. शेतकऱ्यांच्या धान आणि मका खरेदीचे उद्दिष्ट लवकरात लवकर पूर्ण करून, शेतकऱ्यांचे बरेच दिवस प्रलंबित असलेले चुकारे (पेमेंट) तात्काळ त्यांच्या बँक खात्यात जमा करावेत.

---

» Selected

## एटापल्लीत तरुणाची गळफास लावून आत्महत्या..!

एटापल्ली :- तालुक्यातील गुरुपल्ली येथे एका २६ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून गावावर शोककळा पसरली आहे. संतोष जगन्नाथ हजारे (वय २६ वर्षे) असे आत्महत्या केलेल्या मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घटनेच्या वेळी संतोष याच्या घरात इतर कोणीही सदस्य नव्हते. घरात कोणी नसण्याची संधी साधून संतोष हजारे याने आपल्या राहत्या घरातील छताला गळफास लावून आपली जीवनयात्रा संपविली. काही वेळानंतर हा प्रकार शेजाऱ्यांच्या आणि नातेवाइकांच्या निदर्शनास आला. त्यांनी तातडीने पाहिले असता संतोषने गळफास घेतल्याचे उघड झाले. या घटनेची माहिती मिळताच एटापल्ली पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला आहे. या प्रकरणी एटापल्ली पोलिस ठाण्यात सध्या मर्ग (अकस्मात मृत्यू) दाखल करण्यात आला असून, तरुणाने एवढे टोकाचे पाऊल का उचलले, याचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

---

## दारूविक्रेत्यांच्या हालचालींवर महिलांची पाळत ; दोन वर्षांपासून तुकुम गावात दारूबंदी कायम..!

धानोरा :- तालुक्यातील तुकुम या गावाने अवैध दारूविक्रीविरोधात एकजूट दाखवत एक नवा आदर्श ठेवला आहे. ‘मुक्तिपथ’ गाव संघटनेच्या माध्यमातून महिलांनी दारूविक्रीबंदीचा ठराव पारित करून गेल्या दोन वर्षांपासून गावात अवैध दारूविक्री पूर्णपणे बंद पाडली आहे. सद्यस्थितीत गावात शांतता व सुव्यवस्था टिकून असून, पुन्हा दारू विक्री होऊ नये, याकरिता महिलांनी चक्क पाळत ठेवण्यास सुरुवात केली आहे. धानोरा तालुक्यातील तुकुम येथे अवैध दारूविक्रीमुळे कौटुंबिक आणि सामाजिक स्वास्थ्य बिघडत चालले होते. यावर मात करण्यासाठी गावातील महिला संघटनेनी पुढाकार घेतला. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून रीतसर दारूविक्रीबंदीचा ठराव पारित करण्यात आला. केवळ ठराव घेऊन महिला थांबल्या नाहीत, तर ज्या घरांमध्ये छुप्या पद्धतीने दारू गाळून विक्री केली जात होती, अशा विक्रेत्यांच्या घरी जाऊन महिलांनी थेट तंबी दिली. ग्रामपंचायत ठरावाचे उल्लंघन केल्यास कडक कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही यावेळी ठणकावून सांगण्यात आला. गावात पुन्हा कुठेही अवैध दारूची विक्री सुरू होऊ नये, यासाठी मुक्तिपथ गाव संघटनेच्या महिला नियमितपणे गावात आणि परिसरात पहारा देतात. विक्रेत्यांच्या हालचालींवर महिला बारीक लक्ष ठेवून आहेत. विशेष म्हणजे, गावात व्यावसायिक दारू विक्रीसोबतच घरगुती दारू गाळण्यावरही पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. यामुळे गावातील व्यसनाधीनतेचे प्रमाण कमालीचे घटले असून तरुणाई चुकीच्या मार्गाला लागण्यापासून वाचली आहे.

तुकुम गावाला व्यसनमुक्त करण्याच्या या मोहिमेत गावातील पोलीस पाटील संगीता नरोटे, गावसंघटन अध्यक्ष अनिता गेडाम यांच्यासह ग्रामपंचायत समिती आणि स्थानिक महिलांनी अत्यंत मोलाची व धाडसी भूमिका बजावली. गावातील ही बंदी अशीच कायम टिकून राहावी, यासाठी ‘मुक्तिपथ’चे तालुका संघटक राहुल महाकुळकर आणि भास्कर कड्यामी यांचे ग्रामस्थांना वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे. तुकुम गावाच्या या यशस्वी पॅटर्नचे सर्वत्र कौतुक होत असून, इतर गावांनीही याचा आदर्श घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ग्रामसभेत ‘दारूविक्रीमुक्त गाव’ म्हणून घोषित सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मागील दोन वर्षांपासून गावात दारूविक्री पूर्णपणे बंद आहे. या यशाची दखल ग्रामसभेत तुकुम गावाला अधिकृतपणे ‘दारूविक्रीमुक्त गाव’ म्हणून घोषित करण्यात आले आहे. भविष्यातही गावात दारू पाऊल ठेवणार नाही, यासाठी ग्रामस्थांनी दारूविक्रीविरोधात सातत्याने संघर्ष करण्याची सामूहिक शपथ घेतली आहे.

---

## दारूविक्रीविरोधात महिलांचा एल्गार ; विक्रेत्यांकडून घेतले लेखी हमीपत्र..!

विदर्भ केसरी। चामोर्शी

तालुक्यातील कुनघाडा माल येथे अवैध दारूविक्रीविरोधात महिला शक्तीने आक्रमक पाऊल उचलले आहे. गावात दारूविक्रीबंदीचा ठराव मंजूर झाल्यानंतर, सुमारे ३० महिलांनी थेट दारू विक्रेत्यांच्या घरी धडक देऊन पाहणी केली. तसेच ४ प्रमुख दारू विक्रेत्यांकडून ‘यापुढे गावात दारू विकणार नाही’, असे लेखी हमीपत्र लिहून घेतले. या नियमाचे उल्लंघन केल्यास थेट कायदेशीर कारवाई करण्याचा कडक इशाराही या रणरागिणींनी दिला आहे.\कुनघाडा माल येथे मुक्तिपथ अभियानातर्फे सघन गाव भेट उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा एक भाग म्हणून मुक्तिपथचे उपसंघटक आनंद सिडाम यांच्या उपस्थितीत गावात विशेष ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेत गावातील अवैध दारूविक्री आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या विविध गंभीर समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेत उपस्थित महिलांनी आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, गावात अवैध दारूविक्रीमुळे व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले आहे. घरातील कर्ता पुरुष कष्टाची कमाई दारूवर व्यर्थ घालवत असल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत महिलांना स्वतः मोलमजुरी करून घराची चूल पेटवावी लागत आहे. त्यामुळे गावातील दारूविक्री तातडीने थांबविणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत महिलांनी व्यक्त केले. यावेळी मुक्तिपथचे उपसंघटक आनंद सिडाम यांनी गावकऱ्यांना दारूविक्रीबंदीचे सामाजिक व आर्थिक फायदे पटवून दिले, तसेच अवैध व्यवसायांना



आळा घालण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. या चर्चेनंतर सर्वानुमते दारूविक्री बंदीचा ठराव पारित करण्यात आला. कुनघाडा माल गावात सध्या ४ विक्रेत्यांच्या माध्यमातून मद्यपींना दारू पुरवली जात होती, जी बंद करणे अत्यंत गरजेचे झाले होते. ग्रामसभेच्या ठरावानंतर महिलांनी केवळ चर्चा न करता थेट कृती करण्याचे नियोजन केले. गावातील सुमारे ३० महिलांनी एकत्र येऊन त्या ४ दारू विक्रेत्यांच्या थेट घरी जाऊन पाहणी केली. महिलांनी या विक्रेत्यांना गावात दारूविक्री पूर्णपणे बंद करण्याची कडक सूचना दिली. तसेच, यापुढे गावात कोणत्याही प्रकारे दारूविक्री करणार नाही, असे लेखी हमीपत्र सर्व विक्रेत्यांकडून लिहून घेतले. या निर्णयाचे उल्लंघन करून जर कोणी छुप्या पद्धतीने विक्री सुरूच ठेवली, तर पोलीस विभागाच्या माध्यमातून थेट कायदेशीर कारवाई करण्याचा कडक इशाराही महिलांनी दिला आहे. गावातील अवैध दारू बंद करण्यासाठी आता गावातील महिला शक्ती एकवटली आहे. यावेळी पोलीस पाटील मंदा तलांडे, संगीता टेकुलवार, पुष्पा टेकुलवार, सरीता पान्नेमवार, कविता तोटावार, मंजुषा नैताम, वंदना सिडाम यांच्यासह गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

## रांगीत जिल्हाधिकाऱ्यांचा ऐतिहासिक गाव मुक्काम

### विशेष सर्वेक्षण व संतृप्ती मोहिमे अंतर्गत रांगी येथे महत्त्वपूर्ण बैठक

विदर्भ केसरी। धानोरा

देशव्यापी अभियानांतर्गत स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय, रांगी येथे नुकतेच "विशेष सर्वेक्षण व सेवा संतृप्ती मोहीम" अंतर्गत एका महत्त्वपूर्ण शासकीय बैठकीचे आणि विशेष 'गाव भेट व गाव मुक्काम' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. 'जन भागीदारी' वाढवून गावातील शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा थेट लाभ पोहोचवणे आणि कोणताही पात्र व्यक्ती योजनांपासून वंचित राहू नये, हा या विशेष मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमाची रीतसर सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना माल्यार्पण व अभिवादन करून करण्यात आली.

या ऐतिहासिक बैठकीला व गाव भेट कार्यक्रमाला जिल्ह्याचे माननीय अप्पर जिल्हाधिकारी नितीन गावंडे सर आणि जिल्हा परिषदेचे माननीय उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार सर यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्याचे हे दोन्ही सर्वोच्च अधिकारी केवळ बैठक घेऊन परतले नाहीत, तर त्यांनी गाव भेट व गाव मुक्काम कार्यक्रमांतर्गत मौजा रांगी येथेच रात्रीचा मुक्काम



केलंत. जिल्ह्याचा एखादा सर्वोच्च अधिकारी थेट गावामध्ये मुक्कामी येऊन, गावकऱ्यांसोबत बसून त्यांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेतो, असा प्रसंग जिल्ह्याच्या आणि धानोरा तालुक्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच घडला आहे. या अभूतपूर्व व संवेदनशील उपक्रमाबद्दल धानोरा तालुका प्रशासनाच्या वतीने व समस्त गावकऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकारी महोदयांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

या बैठकीला तहसीलदार गणेश माळी, गट विकास अधिकारी रोशन दुबे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शशिकांत साळवे, मंडळ अधिकारी वैशाली डोंगरे , गट शिक्षणाधिकारी हेमलता परसो यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यांच्यासह रांगी क्षेत्राचे महसूल अधिकारी प्रसाद मडावी, ग्रामविकास अधिकारी एन. डी. बांबोळे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक, कृषी सहाय्यक आणि वन विभागाचे क्षेत्र सहाय्यक उपस्थित होते.

बैठकीदरम्यान उपस्थित वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांनी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधून गावातील प्रलंबित प्रश्न व विविध योजनांची सद्यस्थिती जाणून घेतली. नागरिकांनी आपल्या स्थानिक समस्या, कृषी, शिक्षण आणि महसूल विभागाशी संबंधित मागण्या प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. गावकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्यानंतर जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या समस्या सोडवण्यासाठी तात्काळ सर्व संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांना घटनास्थळावरूनच आदेश दिले.

रांगी गावात रात्रभर मुक्काम केल्यानंतर, दुसऱ्या दिवशी सकाळी माननीय जिल्हाधिकारी महोदयांनी गावात सुरू असलेल्या 'विशेष सर्वेक्षण व सॅच्युरेशन' (Saturation) अंतर्गतच्या कामकाजाचा सर्व कर्मचाऱ्यांकडून प्रत्यक्ष आढावा घेतला. गावातील सर्वेक्षणाचे काम तातडीने पूर्ण करून, शासकीय योजनांचा १०० टक्के लाभ तळागाळातील पात्र लोकांना देण्याबाबत त्यांनी कर्मचाऱ्यांना कडक शब्दांत आदेशित केले.

या बैठकीला महसूल कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामपंचायतीचे कर्मचारी, लोकप्रतिनिधी, अंगणवाडी सेविका आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण महत्त्वपूर्ण शासकीय बैठकीचे नेटके सूत्रसंचालन सहाय्यक कृषी अधिकारी श्री. आर. एम. मेश्राम यांनी केले व आभार तहसीलदार गणेश माळी यांनी केले. ही शासकीय मोहीम पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी परिसरातील गावकऱ्यांनी आणि नागरिकांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने शेवटी करण्यात आले.

---

# अशोकजी नेते यांच्या उपस्थितीत ‘मन की बात’

## पंतप्रधान मोदी ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १३४ व्या भागाचे सामूहिक श्रवण

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

गडचिरोली :- देशाचे लोकप्रिय, लाडके आणि यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या बहुचर्चित ‘मन की बात’ या कार्यक्रमाच्या १३४ व्या भागाचे सामूहिक श्रवण आज गडचिरोली येथील शाहूनगर परिसरातील बूथ क्र. १०१ येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांच्या निवासस्थानी आयोजित या कार्यक्रमास किसान मोर्चाचे प्रदेश सचिव रमेशजी भुरसे, आदिवासी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष डॉ. नितीनजी कोडवते, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अरुणजी हरडे, शहर महामंत्री विनोद देवोजवार, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अविनाश विश्रोजवार यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, शक्ती केंद्र



प्रमुख, बूथ प्रमुख आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘मन की बात’च्या १३४ व्या भागामध्ये पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशातील विविध प्रेरणादायी विषयांवर संवाद साधला. यामध्ये भारतीय युवा शक्तीची असामान्य प्रतिभा, राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा क्षेत्रातील विक्रम, झारखंडमधील युवा खेळाडूंची उल्लेखनीय कामगिरी, १०० मीटर धावण्यातील राष्ट्रीय विक्रम, ‘लंगडा’ आंब्याची वैशिष्ट्ये, समाजसेवेसाठी मोठ्या साधनांची नव्हे तर मोठ्या मनाची आवश्यकता, देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांचे योगदान तसेच उष्णतेच्या तीव्र लाटेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घ्यावयाची काळजी यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता. यावेळी पंतप्रधानांनी नागरिकांना उष्माघातापासून बचावासाठी शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच उन्हाळ्यात पुरेशा प्रमाणात पाणी व इतर तरल पदार्थांचे सेवन करून आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश दिला. उपस्थितांनी हा कार्यक्रम अत्यंत लक्षपूर्वक ऐकला व पंतप्रधानांनी मांडलेल्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी मन कि बात हा कार्यक्रम पाहत माजी खासदार डॉ. अशोकजी नेते म्हणाले की, ““मन की बात’ हा केवळ एक रेडिओ कार्यक्रम नसून देशातील सामान्य नागरिकांना प्रेरणा देणारा आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सहभागी होण्याचा संदेश देणारा प्रभावी संवादाचा मंच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश विकासाच्या नव्या उंचीवर पोहोचत असून समाजातील प्रत्येक घटकाला सकारात्मक दिशा देण्याचे कार्य या कार्यक्रमातून होत आहे.” तसेच त्यांनी कार्यकर्त्यांना पंतप्रधानांच्या विचारांचा प्रसार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

### जनजागृतीचा संदेश देणारा कार्यक्रम

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार प्रत्येक बूथवर ‘मन की बात’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रियपणे कार्य करीत असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमानंतर उपस्थित कार्यकर्त्यांनी पंतप्रधानांनी मांडलेल्या विविध विषयांवर चर्चा केली. राष्ट्रहित, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, युवा सक्षमीकरण आणि जनजागृतीचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन बूथ क्र. १०१ च्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

---

# शेतातील विहिरीत पडून वाघाचा मृत्यू; वन विभागात खळबळ..!

विदर्भ केसरी। विनोद सेलोटे

सिंदेवाही (चंद्रपूर) :- ब्रम्हपुरी वन विभागांतर्गत येणाऱ्या सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील डोंगरगाव नियतक्षेत्र अंतर्गत हजारीचक (ता. सिंदेवाही) येथील शेतातील कठडे नसलेल्या विहिरीत पडून एका प्रौढ नर वाघाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज, रविवार ३१ मे रोजी उघडकीस आल्याने वन विभागात एकच खळबळ उडाली. चारगाव (बुज.) येथील शेतकरी पांडुरंग गोविंदा गजभिये यांच्या गट क्रमांक ५१ मधील शेतात कठडा नसलेल्या सिमेंट बांधकामाच्या विहिरीत अंदाजे २५ ते ३० फूट पाणी साचलेले होते. या पाण्यात एक वाघ मृतावस्थेत तरंगताना आढळून आला. सदरची माहिती आज सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास वनविभागाला प्राप्त झाली. त्यानुसार, सिंदेवाही वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी अंजली सायंकार (बोरावार), क्षेत्र सहाय्यक नितीन गडपायले,



वनरक्षक एस.बी. चौधरी तसेच वन कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाच्या प्राथमिक तपासणीत संबंधित वाघ हा अंदाजे ७ ते ८ वर्षे वयोगटातील नर वाघ असल्याचे निष्पन्न झाले. नायलॉन दोर व वाघरीच्या सहाय्याने वाघाचा मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आला. मृत वाघाचे सर्व अवयव शाबूत असल्याचे निदर्शनास आले असून कोणत्याही प्रकारच्या शिकारीची किंवा अवयव चोरीची चिन्हे आढळून आली नाहीत. घटनास्थळी उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी एस.आर., सहाय्यक वनसंरक्षक अरविंद जे., राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) चे प्रतिनिधी बंडू धोत्रे तसेच स्वॅब नेचर केअर फाउंडेशनचे अध्यक्ष यश कायरकर यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प (TATR) चे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे, पशुधन विकास अधिकारी डॉ. विनोद सुर्यवंशी आणि पशुधन विकास अधिकारी बजरंग सावरे यांच्या उपस्थितीत मृत वाघाचे शवविच्छेदन करण्यात आले. प्राथमिक निष्कर्षानुसार, विहिरीतील पाण्यात पडल्याने बुडून वाघाचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पंचनामा, शवविच्छेदन व इतर सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वनाधिकारी, ग्रामपंचायत प्रतिनिधी व पंचांच्या उपस्थितीत मृत वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास व कार्यवाही ब्रम्हपुरी वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली सिंदेवाही वनपरिक्षेत्रामार्फत सुरू असल्याची माहिती वनविभागाने दिली.